सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. २५ मार्च २०२५ वर्ष दुसरे अंक ३५८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गटशेतीचे नवे धोरण आणून आर्थिक मदत वाढवू : देवेंद्र फडणवीस




पुणे, २४ मार्च

राज्य शासनाच्या वतीने २०१६ सालापासून वीस शेतकरी व १०० एकर जमीन असेल तर गटशेतीला आतापर्यंत एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. आता राज्य सरकार गटशेतीचे नवे धोरण आणणार असून आर्थिक मदत वाढवू. त्यातून गटशेतीला आपण आंदोलनाचे स्वरूप देऊ, अशी महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली.

बालेवाडी येथील शिवछत्रपती शिवाजी क्रीडा संकुलात येथे पाणी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'सत्यमेव जयते शेतकरी चषक २०२४'च्या भव्य पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आमीर खान आणि किरण राव यांनी स्थापन केलेली ही संस्था २०१६ पासून दुष्काळमुक्त आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचे काम करत आहे.

कृषिमंत्री श्री. माणिकराव कोकाटे, सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विलास शिंदे, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक श्री. शांतीलाल मुथा आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह आमीर खान, किरण राव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यंदाच्या शेतकरी चषक स्पर्धेत महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांतील ४,३०० पेक्षा अधिक शेतकरी गटांनी (सुमारे २००० महिला गट) भाग घेतला. यात सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील तेरती या गावातील 'भाग्योदय शेतकरी गट' संघाने राज्य पातळीवरील प्रथम पारितोषिक पटकावत २५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, तसेच प्रतिष्ठेची शेतकरी चषक ट्रॉफी जिंकली. सातारा जिल्ह्यातील भोसरे (ता. खटाव) येथील सरसेनापती प्रतापराव गुजर महिला शेतकरी गट आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोबलगाव (ता. खुलताबाद) या दोन संघांना संयुक्तरीत्या १५ लाख रुपयांचे राज् पातळीवरील द्वितीय पारितोषिक देण्यात आले. तर हिंगोली जिल्ह्यातील कवडा (ता. कळमनुरी) येथील जय बिरसा मुंडा शेतकरी गट आणि वाशिम जिल्ह्यातील नागी (ता. मंगरूळ पीर) येथील माऊली शेतकरी गटाने संयुक्तरीत्या १० लाख रुपयांचे तृतीय पारितोषिक जिंकले.सर्व महिला गटांना दोन राज्यस्तरीय पारितोषिके आणि तालुकास्तरीय प्रत्येकी ५० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, मी आधीपासून आमीर खान यांना सांगत होतो तुमची क्षमता संपूर्ण महाराष्ट्राची आहे. आज माझी इच्छा पूरी केल्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. पाणी फाऊंडेशनचा जलसंधारणाचा विचार सर्वत्र झपाट्याने पसरला पाहिजे. जोपर्यंत शेतकरी व लोक पाण्याचे शास्त्र शिकत नाहीत, जलसंधारणात लोकसहभाग वाढत नाही तोपर्यंत महाराष्ट्र दुष्काळीच राहील.

यावेळी बोलताना पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमीर खान यांनी २०२६ पासून पाणी फाऊंडेशन आपले कार्य संपूर्ण महाराष्ट्रात करणार असल्याची महत्त्वाची घोषणा केली. यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी चषक स्पर्धेचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यातून त्यांना प्रशिक्षण मिळेल आणि एकरी खर्च कमी करण्यासाठी आणि एकरी उत्पादकता आणि उत्पन्न सुधारण्यासाठी ज्ञान मिळेल. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते सर्व तालुकास्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पाणी फाऊंडेशनच्या कार्याला शासनाच्या वतीने संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यजित भटकळ यांनी संस्थेच्या कार्याचा प्रभाव मांडताना २०२४ मध्ये शेतकरी चषकात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना १०० कोटी रुपयांहून अधिक अतिरिक्त नफा झाल्याचे नमूद केले. संस्थेचे मुख्य सल्लागार डॉ. अविनाश पोळ यांनी शेतकरी गट स्पर्धेच्या चौकटीबाहेर जाऊन लघुउद्योग व आर्थिक उपक्रम उभारण्यासाठी कसे विलक्षण कार्य करीत आहेत, याची माहिती दिली.

## ईपीएस -९५ पेन्शनर संघटनेच्या वतीने पीएफ आयुक्तांकडे निवेदन सुपूर्द



छत्रपती संभाजीनगर : दिनांक २४ मार्च २०२५ सोमवार रोजी आदरणीय कमांडर अशोक राऊत साहेब यांच्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर भविष्य निधी कार्यालयावर ध्यानाकर्षण धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने ईपीएस-९५ पेन्शनर बंधू-भगिनी आवर्जून उपस्थित होते. आज आंदोलनाच्या वेळी संघटनेचे दत्ताभाऊ वाकडे, सौ कविता भालेराव, अरुण कुलकर्णी, कमलाकर पांगारकर, बांबर्डे महाराज यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नंतर पेन्शन वाढीचे निवेदन ७५००/- आणि महागाई भत्ता हीच आमची मागणी असल्याचे निवेदन आयुक्त साहेब भविष्य निधी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आले. आपले निवेदन आदरणीय केंद्रीय कामगार मंत्री श्री मनसुख मांडवीया जी यांना पाठवण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानण्यात आले तसेच कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत झाल्यानंतर करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन छत्रपती संभाजीनगर शहर अध्यक्ष श्री सी.एम.कांबळे यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्र संचलन श्री हरून पठाण यांनी केले.उन्हाची तीव्रता असतानाही मोठ्या संख्येने पेन्शनर बंधु भगिनींची उपस्थिती होती.

# खासदारांच्या पगार आणि भत्त्यांमध्ये भरघोस वाढ



नवी दिल्ली : मार्च महिना संपत आला आहे. आर्थिक वर्ष २०२४ – २५ संपणार आहे. यामुळे नोकरी करत असलेल्यांना पगारवाढीचे वेध लागले आहेत. या पार्श्वभूमीवर आनंदाची बातमी आली आहे. तब्बल सात वर्षांनंतर खासदारांच्या पगार आणि भत्त्यांमध्ये भरघोस वाढ झाली आहे. ही वाढ १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे. पगारवाढीची अधिसूचना जारी झाली आहे.

आधी खासदारांचा मासिक पगार एक लाख रुपये होता. आता खासदारांचा मासिक पगार एक लाख २४ हजार रुपये असेल. खासदारांचा दैनिक भत्ता सध्या दोन हजार रुपये आहे जो वाढीनंतर अडीच हजार रुपये होणार आहे. खासदारांचे निवृत्ती वेतन आधी दरमहा २५ हजार रुपये होते, आता ते दरमहा ३१ हजार रुपये असेल. जर खासदार म्हणून पाच वर्षांपेक्षा जास्त काळ काम केले असेल तर आधीच्या कार्यकाळातील प्रत्येक वर्षासाठी आधी दरमहा दोन हजार रुपये निवृत्ती वेतन होते ते आता दरमहा अडीच रुपये एवढे मिळेल.

महागाई दरात वाढ झाल्यामुळे वेतन आणि भत्ते वाढविण्यात आले आहेत. हा निर्णय २०१८ पासून लागू केलेल्या नियमांतर्गत घेण्यात आला आहे, ज्यामध्ये दर पाच वर्षांनी खासदारांच्या वेतन आणि भत्त्यांचा आढावा घेण्याची तरतूद आहे. हा आढावा महागाई दरावर आधारित आहे.

खासदारांना ७० हजार रुपये मतदारसंघ भत्ता देखील मिळतो. २०१८ च्या दुरुस्तीनुसार, हे पैसे खासदारांना मतदारसंघातील जनसंपर्क खर्च म्हणून दिले जातात. याशिवाय, त्यांना दरमहा कार्यालयीन भत्ता म्हणून ६०,००० रुपये आणि संसदीय अधिवेशनादरम्यान दैनिक भत्ता म्हणून २००० रुपये मिळतात. हे भत्तेही आता वाढवले जातील.

याआधी कर्नाटक विधानसभेने मुख्यमंत्री, मंत्री आणि विधिमंडळ सदस्यांच्या पगारात वाढ करण्याची तरतूद करणारे विधेयक मंजूर केले. या विधेयकात विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद अध्यक्षांचे मासिक वेतन ७५ हजार रुपयांवरून १.२५ लाख रुपये करण्यात आले.

## भेंडाळा येथे मळणी यंत्रात अडकून शेतकऱ्याचा मृत्यू

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२४ : तालुक्यातील भेंडाळा येथे गहू सोंगताना मळणी यंत्रात अडकून बाळू वाकचौरे (३२) यांचा सोमवारी (दि.२४) सकाळी साडेअकरा वाजता मृत्यू झाला आहे.

मृत बाळू वाकचौरे भेंडाळा येथील रहिवासी असून तो गावातीलच मळणी यंत्रचालका सोबत शेतामध्ये गहू काढण्याचे काम करत होता. या घटनेची माहिती मिळताच चालक तुषार पाठे यांनी तात्काळ धाव घेऊन गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पुढील तपास गंगापूर पोलीस करत आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

# अखेर अनधिकृत रहाटपाळणे नगरपरिषदेने केले सील



तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या नगर परिषद यात्रा मैदान पंप हाऊस रहाटपाळणे जागा लिलाव प्रक्रियेला अखेर नगरपरिषदेने न्याय देत बेकायदेशीर सुरू करण्यात आलेल्या रहाट पाळण्यांना सोमवारी पोलीस बंदोबस्तात सील करण्यात आले.

नाथषष्ठी यात्रेच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेच्या वतीने पारंपरिक यात्रा मैदान पंप हाऊसच्या जागेवर रहाट पाळण्यासाठी नगर परिषद प्रांगणात १३ मार्च रोजी जाहीर लिलाव करण्यात आला होता. या लिलावात रीतसर अनामत रक्कम भरून १२ व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता.ज्यात २७ लाखांची सर्वात मोठी बोली बोलणारे गणेश वाघमोडे यांना हा लिलाव देण्यात येऊन त्यांना पैसे भरण्यासाठी २४ तासांची मुदत देण्यात आली होती. यावेळी अधिकाऱ्यांनी लिलाव प्रक्रिया पारदर्शकपणे नाही राबवता व्यक्ती केंद्रित राबवल्याचे म्हणत लिलावात २६ लाख ९६ हजारांची क्रमांक तीन ची बोली लावणारे मनोज मैड यांनी लिलावावर आक्षेप घेऊन आंदोलन करण्याचा ईशारा दिला होता.यावेळी त्यांच्यासोबत अन्य ८ व्यापारी उपस्थित होते. वाघमोडे यांनी लिलावात बोललेली रक्कम नाही भरल्याने क्रमांक २ ची २६ लाख ९७ हजारांची बोली बोलणारे जाहीर यांना पैसे भरण्यास प्राधान्य देण्यात आले होते. त्यांनीही दिलेल्या वेळेत पैसे नाही भरल्याने मनोज मैड यांना नगर परिषदेच्या वतीने पैसे भरण्यासाठी प्राधान्य देण्यात आले. यावेळी ताबडतोब मैड नगर परिषदेत पैसे भरण्यासाठी आले असता. लिलाव झालेल्या जागेवर काही लोकांनी अतिक्रमण करून बेकायदेशीर रहाटपाळणे उभारल्याचे लक्षात येताच त्यांनी नगर परिषदेने अतिक्रमण हटवून जागा मोकळी करून देण्याचे पत्र विभागीय आयुक्त तसेच नगर परिषदेला दिले. शेवटी पाच दिवस झाल्यानंतर नगर परिषदेच्या वतीने पोलीस बंदोबस्तात बेकायदेशीर रहाटपाळण्यांवर सील ठोकून कारवाई करण्यात आली. दरम्यान गेल्या पाच दिवसांपासून बेकायदेशीर रहाटपाळण्याच्या चालकाकडून अव्वा की सव्वा तिकीट दर लावून हजारो नागरिकांची लूट केल्याचा प्रकार घडला आहे. आजच्या यधाडसी कारवाईत मुख्याधिकारी संतोष आगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद पथक उप मुख्याधिकारी नागेश खोडवे, उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे,विजय पैठणे, अशोक पगारे, नवनाथ जगधने,शंकर नवगिरे, रियाज शेख, अश्विन गोजरे, अशोक मगरे, पिनूभाऊ कारके, राहुल पगारे, सचिन वळुंज,प्रकाश नवगिरे,जितू घोडके यांनी सहभाग घेतला.

## एमजीएम बहुविधाच्या संचालक स्नेहलता दत्ता यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर -



एमजीएम महागामीच्या संचालक गुरु पार्वती दत्ता यांच्या मातोश्री आणि एमजीएम बहुविधाच्या संचालक स्नेहलता दत्ता यांचे आज दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता वयाच्या ८४ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे.

त्यांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी महागामी येथे त्यांच्या घरी दुपारी १ ते २ वाजेपर्यंत ठेवण्यात आले आहे. तसेच एमजीएम आइन्स्टाईन हॉलच्या समोर दुपारी २ ते ४ पर्यंत अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात येईल .

आज दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता त्यांच्या इच्छेनुसार त्यांना देहदान करायचे होते, त्यानुसार त्यांचे पार्थिव एमजीएम हॉस्पिटल येथे दान केले जाईल.

त्यांच्या पश्चात मुलगा आकाश, मुलगी पार्वती आणि सुनबाई आणि नात नव्या हे आहेत.

# कॉमेडियन कुणाल कामराच्या प्रतिमेला जोडे मारो



तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- कॉमेडियन कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणे तयार करून त्याची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला त्या प्रकरणी त्याचा आमदार विलास बापू संदिपानजी भुमरे यांचा मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना पैठण तालुका व पैठण शहर यांच्या वतीने कामराच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी शहरप्रमुख तुषार पाटील, सोमनाथ परदेशी सरपंच किशोर चौधरी शिवराज पारिख नामदेव खरात राजु मापारी बाळासाहेब माने सोमनाथ परळकर जालिंदर आडसुळ अजित पगारे संजय कस्तुरे सुनील हिंगे मनोज गायके जनार्दन मिटकर आबासाहेब गिरगे भारत कासोदे ऋषी दहिभाते अमित गोरे किरण घाट विसावे विलास मोरे मनिष ओटे अमोल गिरगे अक्रूर गलधर ,बाबासाहेब घटे,विष्णू जगताप योगराज बुंदिले पदम खंदारे विष्णू खंडागळे विकी खांडेकर अक्षय सपकाळ भरत बोडके महेश बोडके रामा चौके अविनाश चौके सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# शताब्दीत रा.स्व.संघाकडून विस्तारासह संघटित- समरस हिंदू समाजाच्या निर्मितीचा संकल्प

## १ शताब्दी पर्वात देशभरात एक कोटींहून अधिक संघ कार्यकर्ते होणार सहभागी

पुणे, ता. २४ - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यावर्षी विजयादशमीला शंभर वर्षे पूर्ण करत आहे. शताब्दी वर्षात संघ कार्याचा विस्तार व समाज परिवर्तन यावर भर देण्यात येणार असून अधिक गुणात्मक आणि व्यापक काम करण्याचा संकल्प करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेची सांगता (रविवार, २३ मार्च २०२५) झाली. या सभेत बांगलादेशातील हिंदू समुदायावर झालेले हल्ले व अनन्वित अत्याचारसंबंधी चिंता व्यक्त करणारा व बांगलादेशातील हिंदू समाजासाठी एकी दाखविण्याचे आवाहन करणारा ठराव पारित करण्यात आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभा दि. २१ ते २३ मार्च २०२५ दरम्यान बंगळुरू येथे झाली. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या प्रतिनिधी सभेमध्ये देशभरातून १,४४३ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

प्रतिनिधी सभा व संघाची पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील कार्याची सद्यस्थिती संबंधाने सोमवारी (२४ मार्च २५) पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक प्रा. नानासाहेब जाधव यांनी माहिती दिली. यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव, प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री, पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले आणि विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी उपस्थित होते.

प्रतिनिधी सभेबद्दल अधिक माहिती देताना प्रांत संघचालक प्रा. नानासाहेब जाधव यांनी सांगितले की, संघाचा उद्देश हा शताब्दी पर्वाचा मोठा टप्पा साजरा करण्याचा नसून १) आत्मनिरीक्षण करणे, २) संघाच्या कार्याला समाजाने दिलेल्या पाठिंब्यास प्रतिसाद देणे आणि ३) राष्ट्राच्या कार्यासाठी आणि समाजाच्या संघटनेसाठी स्वतःला पुन्हा समर्पित करणे हा आहे. या संकल्पासाठी आगामी काळात संघ विस्ताराचे ध्येय साध्य करण्यासाठी तसेच स्व-आधारित व्यवस्था, पर्यावरण, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन आणि नागरी कर्तव्य या 'पंच परिवर्तना'च्या सूत्रांच्या आधारे काम होणार आहे.

संघ शताब्दीत अनेकविध उपक्रम - संघ शताब्दी वर्षात आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांबद्दल सांगतना प्रांत कार्यवाह डॉ. दबडघाव यांनी सांगितले की, १. शताब्दी वर्षाची सुरुवात विजयादशमी २०२५ पासून होईल. त्यात संघ गणवेशात स्वयंसेवकांचे तालुका किंवा नगर स्तरावरील कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. २.



साधारणपणे नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या काळात ऋहर गाव, हर बस्ती, घर-घरऋ (प्रत्येक गाव, प्रत्येक वस्ती आणि घरोघरी) या संकल्पनेनुसार तीन महिन्यात मोठ्या प्रमाणात घरोघरी संपर्क मोहीम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यात स्थानिक शाखांकडून संघ संबंधित माहिती दिली जाईल आणि काही कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. ३. सर्व मंडले किंवा वस्तींमध्ये हिंदू संमेलने आयोजित केली जातील. त्यामध्ये भेदभाव न बाळगता सर्वांच्या दैनंदिन जीवनात एकता आणि सुसंवाद, राष्ट्रकार्यात प्रत्येकाचे योगदान आणि पंच परिवर्तनात प्रत्येक व्यक्तीचा सहभाग हा संदेश दिला जाणार आहे. ४. तालुका/शहर पातळीवर सामाजिक सद्भाव मेळावे आयोजित करण्यात येतील. त्यामध्ये समरसतेने जगण्यावर भर दिला जाईल. सांस्कृतिक पाया आणि हिंदू चारित्र्य न गमावता आधुनिक जीवन जगणे हा या मेळाव्यांचा विषय असणार आहे.५. जिल्हा पातळीवर नागरिक संवाद मेळावे आयोजित करण्यात येतील. राष्ट्रीय मुद्द्यांवर योग्य दृष्टिकोन मांडण्यावर आणि आज समाजात प्रचलित असलेले चुकीचे विमर्श बाजूला ठेवण्यावर या कार्यक्रमांचा भर असेल. ६.पश्चिम महाराष्ट्र प्रांताकडून युवकांसाठी विशेष कार्यक्रमांचे नियोजन केले जाईल. १५ ते ३० वयोगटातील युवकांसाठी राष्ट्र उभारणी उपक्रम, सेवा उपक्रम आणि पंच परिवर्तन यावर लक्ष केंद्रित करणारे कार्यक्रम मोठ्या संख्येने हाती घेण्यात येणार आहेत. स्थानिक गरजेनुसार या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येणार आहे. संघ शाखांची स्थिती आज देशभरात ५१ हजार ५७० ठिकाणी दररोज एकूण ८३ हजार १२९ शाखा आयोजित केल्या जातात, ज्या मागील वर्षीच्या ७३ हजार ६४६ पेक्षा १० हजारांहून अधिक शाखा आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत साप्ताहिक मिलनची संख्या ४ हजार ४३० ने वाढली आहे तर शाखा आणि साप्ताहिक मिलनची एकूण संख्या १ लाख १५ हजार २७६ आहे.

२०२५ पर्यंतच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखेची देशातील आकडेवारी

एकूण ठिकाणे: ५१ हजार ५७०, एकूण शाखा (दैनिक): ८३ हजार १२९, एकूण मिलन (साप्ताहिक): ३२ हजार १४७, एकूण मंडळी (मासिक): १२ हजार ०९१, एकूण शाखा + साप्ताहिक मिलन+ मंडळी: १ लाख २७ हजार ३६७,

संघ कार्याची प्रांतातील आकडेवारी

या विस्तारात पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील शाखा विस्तारा संबंधाने रा.स्व. संघ पश्चिम महाराष्ट्राचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांनी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्र प्रांतात आज रोजी २४६ ठिकाणी ७८६ शाखा, २८९ ठिकाणी ७१८ साप्ताहिक मिलने व २९४ ठिकाणी ३५९ संघमंडळी असा विस्तार आहे. पुणे महानगरात ५३ ठिकाणी ३१९ शाखा, २४५ साप्ताहिक मिलने असा संघ शाखांचा विस्तार आहे.

रा. स्व. संघ : युवा संघटना

डॉ. दबडघाव पुढे म्हणाले की, संघकार्यात सामील होणाऱ्या तरुणांच्या संख्येत सतत वाढ होत आहे.

दरवर्षी लाखो तरुण, विशेषतः १४-२५ वयोगटातील यातून जोडले जात आहेत. संघ स्वयंसेवक ते कार्यकर्ता असे प्रशिक्षण दिल्या जाणाऱ्या संघाच्या प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत देशभरात एकूण ४ हजार ४१५ प्रारंभिक वर्ग आयोजित केले आहेत. त्यातून २लक्ष २२ हजार ९६२ जण सहभागी झाले होते. त्यापैकी १ लक्ष ६३ हजार हे १४-२५ या वयोगटातील होते. तर २० हजारांहून अधिक जण ४० वर्षांपेक्षा अधिक वयाचे होते. दुसरीकडे www.rss.org या संकेतस्थळाच्या माध्यमातून २०१२ पासून, १२लक्ष ७२ हजार ४५३ हून अधिक नागरिकांनी रा.स्व.संघामध्ये सहभागी होण्यास आपली रुची दाखविली, ज्यात ४६हजार हून अधिक पेक्षा जास्त महिलांचा सहभाग आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विश्वकोष मंडळाने सर्वच शाखांना सामावून घेतले: डॉ. कदम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** मराठी विश्वकोषाने मराठी भाषेलाच नव्हे तर सर्वच ज्ञान-विज्ञान शाखांना सामावून घेतले आहे, असे प्रतिपादन विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. नरसिंह कदम यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ आणि नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे लातूर येथील उपकेंद्र परिसराच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी विश्वकोष नोंदलेखन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक डॉ. राजेश शिंदे, डॉ. एस. एस. कोंडेकर, विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य संतोष गेडाम, डॉ. अनिल जायेभाये, संध्या गवळी, सुरेश खोले, डॉ. पद्माकर सहारे, डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. अशोक नारनवरे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर कडेकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. कदम म्हणाले, मराठी विश्वकोष हा मराठी भाषेशी संबंधित नसून सर्व ज्ञान-विज्ञान शाखांना मराठी विश्वकोषाने सामावून घेतले आहे. सर्व विद्याशाखीय विषयांच्या नोंदी यात करता येऊ शकतात. विद्यापीठ उपपरिसराचे संचालक डॉ. राजेश शिंदे यांनी विश्वकोष निर्मिती मंडळ ही एक

महाराष्ट्र शासनाची महत्वाची संस्था आहे. मराठी भाषेत सर्वसमावेशक आणि प्रमाणबद्ध ज्ञानकोष निर्मितीचे कार्य करते. यासाठी जास्तीत जास्त नोंदी व्हाव्यात, अशी अपेक्षा नवोदित लेखकांकडून व्यक्त केली. पहिल्या सत्राचा समारोप डॉ. एस. एस. कोंडेकर यांच्या मार्गदर्शनाने झाला. तीन सत्रांत झालेल्या या कार्यशाळेतील पहिल्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक विश्वकोष निर्मिती मंडळाचे संतोष गेडाम यांनी 'मराठी विश्वकोष नोंदलेखन' या विषयावर मार्गदर्शन केले.



### संक्षिप्त वृत्त...

## मशाल रॅलीने शहीदांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहीद भगतसिंह, सुखदेव व राजगुरू यांच्या शहीद दिनानिमित्त येथील वीर शहीद भगतसिंह स्मारक समितीच्यावतीने रविवारी सायंकाळच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क ते शहीद भगतसिंह चौकापर्यंत मशाल रॅली काढण्यात आली. यावेळी तरुणांच्या हातात तिरंगा झेंडे होते. देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



येथील भगतसिंह स्मारक कृती समितीच्यावतीने शहीददिनानिमित्त शहराच्या आंबेडकर पार्कवरून रविवारी सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास ही मशाल रॅली निघाली. यावेळी सहभागी तरुणांच्या हातात पेटलेल्या मशाली, काही तरुणांच्या हातात तिरंगा झेंडे झळकत होते. प्रत्येकाने देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर शहीद भगतसिंह, सुखदेव व राजगुरू यांच्या अलिदानांची आठवण करून देणारा २३ मार्च हा दिवस ओळखला जातो. ही आठवण तरुणाईच्या मनात तेवत राहावी, यासाठी ही मशाल रॅली काढण्यात आली. स्मारक समितीचे गुलजितसिंग जुन्नी यांच्या नेतृत्वात निघालेल्या या रॅलीत ॲड. प्रदीप पाटील खंडापूरकर, मनोज डोंगरे, सूर्यासिंग राजपूत, ॲड. राधिका पाटील यांच्यासह तरुण, तरुणी आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## सुखदेव व राज गुरुंना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** भारतीय स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर शहीद भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमांना लातूर जिल्हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. परंतु, शहिदांचे समाजवादी भारताच्या निर्मितीचे स्वप्न हे स्वप्नच राहिले. शहीद भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांचे बलिदान हे कायम स्मरणात राहील. त्यांनी देशासाठी फार मोठा त्याग केला होता, असे ते म्हणाले. यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. सुधाकर शिंदे, कॉ. विश्वंभर भोसले, माकपचे लातूर तालुका सचिव कॉ. संजय मोरे, रेणापूर तालुका सचिव कॉ. डी.पी कांबळे, जिल्हा सचिव कॉ. अशोक गायकवाड, प्रा. शरद पवार, संतोष शेळके, सोमनाथ जाधव, अजित पवार उपस्थित होते.

## व्हीएस पँथर्स जिल्हाध्यक्षपदी कांबळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** येथील व्हीएस पँथर्स विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्षपदी स्वप्निल कांबळे यांची संस्थापक अध्यक्ष विनोद खटके व प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूरच्या भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात पार पडलेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली. नियक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

लातूर जिल्ह्यात व्हीएस पँथर्स या सामाजिक संघटनेकडून शोषित, वंचित, शेतकरी, महिला व मजुरांच्या अडीअडचणींसह प्रश्नांबाबत आवाज उठवून न्याय देते. लातूर पॅटर्न शिक्षणाच्या बाबतीत देशभरात प्रसिध्द आहे. त्यामुळे विद्यार्थी व शैक्षणिक विविध समस्यांच्या सोडविण्यासाठी विद्यार्थी आघाडी गठीत केली. पूर्वी किरण पायाळ यांनी समर्थपणे जिल्हाध्यक्षपदाची धुरा सांभाळली आहे. आता स्वप्निल कांबळे यांच्यावर ही जबाबदारी सोपवित असल्याची घोषणा संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी केली.

यावेळी ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे, मार्गदर्शक संतोष मांदळे, रवि कुरील, संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हाध्यक्ष शरद किणीकर, शहराध्यक्ष असद शेख, ग्रुप शहराध्यक्ष संतोष जाधव, औसा तालुकाध्यक्ष सुनील सातपुते, चाकूर तालुकाध्यक्ष अजय वाघमारे, औसा शहराध्यक्ष महेश कांबळे, निलंगा प्रतिनिधी विनोद कांबळे, सूरज सूर्यवंशी, शाहरुख मणियार, हुसेन मांदळेसह पदाधिकारी उपस्थित होते.

# शहरात वाहतुकीची कोंडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. यासह जुना रेणापूर नाका व गुळ मार्केट चौकात वाहतुकीची कोंडी होत आहे. यामुळे भर उन्हात वाट काढण्यासाठी धडपडावे लागत आहे.

या ठिकाणची वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांच्या नाकेनऊ येत आहेत. पण, ही कोंडी काही केल्या फुटत नाही. या वाहतूक कोंडीने लातूरकर बेजार झाले आहेत. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी याकडे लक्ष देऊन

> शहरातील वाहतुकीला शिस्त लागावी. चौकांमधील वाहतूक विस्कळीत होऊ नये म्हणून महापालिका अंतर्गत १८ ठिकाणी वाहतूक सिग्नल बसविण्यात आले आहेत. मात्र, यातील विवेकानंद चौक, शाहू महाराज चौक, सुभाष चौक, नंदी स्टॉप, खर्डेकर स्टॉप, आदर्श कॉलनी, राजस्थान शाळेसमोरील चौक या आठ सिग्नलचा वापरच नाही. विशेष म्हणजे चालू असणारे सिग्नल अधूनमधून बंद असतात. अनेकदा सिग्नल बंद असल्याचे समजून वाहनधारकांकडून नियमांचे उल्लंघन होत आहे. यामुळे वाहतुकीच्या कोंडींत भर पडत आहे.

वाहतुकीची कोंडी फोडण्याबाबत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

लातुरात गेल्या काही वर्षांत वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे शहराच्या रस्त्यावर मोठ्या संख्येने वाहने दिसून येतात. यात शहरातील शिवाजी महाराज चौक हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. शिवाजी महाराज चौकात उड्डाण पूल असला तरी त्याचा फारसा वापर होत नाही. बहुतांश वाहनधारक नेहमीच्याच रस्त्याचा वापर करताना दिसतात. याच भागातून जुन्या रेल्वे लाइनचाही रस्ता गेलेला आहे.





शहरातील मुख्य रस्ता, जुन्या रेल्वे लाइनचा रस्ता व रेणापूर रस्त्यांवरून वाहने एकाच वेळी शिवाजी महाराज चौकात येतात. त्यामुळे नेहमीच या चौकात वाहतुकीची कोंडी होत आहे. या चौकात सिग्नल लावण्यात आले आहेत.

पण, त्याचा फारसा उपयोग होत नाही. लाऊड स्पिकरच्या योजनेचाही उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे.

आतापर्यंतच्या आलेल्या वेगवेगळ्या पोलीस अधीक्षकांनी काही प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. पण, परिस्थिती 'जैसे थे'च राहिली आहे. वाहतुकीची कोंडी काही केल्या संपत नाही. त्यात सकाळी आणि सायंकाळी शासकीय कार्यालये भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळी ही कोंडी अधिकच होते.

वाहतुकीवर कसे नियंत्रण मिळवता येईल यासाठी वाहतुकीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे सांगीतले जाते.

# मौन, एकाग्रता व आत्मविश्वास यशाची त्रिसूत्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** आपल्याला जीवनात यशस्वीता हवी असेल तर मौन, एकाग्रता आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीचा अवलंब करावा. हीच शैक्षणिक क्षेत्रातील यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. वंदना मिश्रा यांनी केले.



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय गवई होते. विचारमंचावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. गीता गिरवलकर, डॉ. भाग्यश्री दाणे आणि डॉ. श्रीराम भालेराव यांची उपस्थिती होती. प्रारंभी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. मिश्रा म्हणाल्या, शिक्षणात प्रगती व ध्येय गाठण्यासाठी मन शांत ठेवल्यास निर्णय क्षमतेत सुधारणा होऊन आत्मविश्वास वृध्दिंगत होतो. यासाठी सोशल मीडिया व स्मार्ट फोनचा वापर कमी करावा. मनाच्या एकाग्रतेसाठी योग व ध्यान धारणेवरही भर द्यावा. लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टींना टाळून ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास याचा फायदा केवळ विद्यार्थी दशेतच नव्हे तर व्यावसायिक व व्यक्तिगत जीवनातही होतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले, देशात सुशासन निर्माण होण्यासाठी लोकप्रशासन विषयाची आवश्यकता आहे.

लोकप्रशासन मानवाच्या उत्क्रांती सोबतच अस्तित्वात आला आहे. अध्यक्षीय समारोप डॉ. गवई यांनी केला. सूत्रसंचालन बुशरा सय्यद हिने केले. डॉ. श्रीराम भालेराव यांनी आभार मानले.



## स्त्रीशक्तीने ठरवल्यास जगातील कुठलेही कार्य अशक्य नाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** स्त्रिशक्तीने ठरवल्यावर जगातील कुठलेही कार्य अशक्य नाही. तिला केवळ प्रेम आणि सन्मान दिला पाहिजे. यामुळे आपला समाज खूप प्रगत होईल, असे प्रतिपादन सह्याद्री देवराईचे अरविंद जगताप यांनी रविवारी येथे आयोजित पर्यावरणप्रेमी महिला सन्मान सोहळ्यात केले.

दोन महिन्यांपूर्वी सह्याद्री देवराईचे सर्वेसर्वा सिनेअभिनेते सयाजी शिंदे व सह्याद्री देवराईचे समन्वयक सुपर्ण जगताप यांनी निसर्ग, पर्यावरणावर प्रेम करणाऱ्या विविध क्षेत्रातील शिक्षिका, डॉक्टर, गृहिणी अशा महिलांची बैठक घेऊन महाराष्ट्रातील दुर्मिळ वनस्पतींची माहिती एकत्रित करून ती देण्याबाबत आवाहन केले होते. त्यात मास रोहिणी, काळाकुडा, मेंढशिंगी, देवसावर, सोनसावर, शिवण, रान पांगरा, भोकर, हुंब, हेकळ, गोकर्ण, हिवर, उंडी, करवंद, कारं, मोह, पार जांभुळ, शिरीष, अर्जुन, काटेसावर, अशा विविध जवळपास दोनशे वनस्पतींची माहिती जमा करून या निसर्गप्रेमी महिलांनी सह्याद्री देवराईचे अरविंद जगताप व समन्वयक सुपर्ण जगताप यांच्याकडे दिली. ही माहिती एकत्रित करून सह्याद्री देवराईतर्फे पुस्तक तयार करण्यात येणार आहे. हे पुस्तक भविष्यात शालेय मुलांना या वनस्पतींचे ज्ञान मिळावे म्हणून शिक्षण विभागाला देण्यात येणार आहे.

यावेळी 'द्वारकादास श्यामकुमार'चे तुकाराम पाटील, डॉ. आरती झंवर, राजस्थानी महिला मंडळाच्या अर्चना सोमाणी, रुपाली बोराडे, सपना मशरू, धवल मशरू, डॉ. बी. आर. पाटील यांच्या हस्ते पर्यावरणप्रेमी महिलांना सन्मानित करण्यात आले. यावेळी नंदिनी पडिले, डॉ. दशरथ भिसे, भीम दुनगावे, अमृत सोनवणे, प्रशांत हल्ले, डॉ. गणेश गोमारे आदी उपस्थित होते.

# ७५ कोटींच्या कर वसुलीचा पालिकेने गाठला उच्चांक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** महापालिकेची स्थापना होऊन १४ वर्षांचा काळ लोटत आहे. लातूर नगरपरिषद असताना व येथील नागरिकांना कर भरण्याची तेवढी माहिती नव्हती. यामुळे महापालिका अस्तित्वात आल्यानंतर कराची वसूली करण्याचे मोठे आव्हान पालिकेपुढे होते.

परंतु, संपूर्ण आर्थिक धुरा केवळ कर वसुलीवरच असल्याने मागील दोन वर्षांपासून पालिकेने कर वसुलीवर भर दिला आहे. गेल्यावर्षी ५३ कोटींची वसूली झाली होती. यावर्षी त्यात तब्बल २० कोटींची वाढ झाली आहे. आतापर्यंत तब्बल ७५ कोटींची वसूली करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात आणखी ५ कोटींची वसूली करण्याचा पण पालिकेने बांधला आहे.

महापालिका अस्तित्वात आल्यापासून मागील १४ वर्षांत म्हणावा तेवढा कर वसूल होत नव्हता. यामुळे दरवर्षी मार्चअखेर आल्यानंतर पाणी, विद्युत पथदिवे यांचे कनेक्शन किमान पंधरा ते २० दिवस तोडलेलेच असत. पालिकेकडे पैसाच नसल्याने शेवटी राज्य शासनाला हस्तक्षेप करून विद्युत पथदिवे व पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन सुरू करून घ्यावे लागत होते. विशेष म्हणजे मागील दोन वर्षांपासून लातूरकरांवर पाणी कनेक्शन, विद्युत पथदिव्यांचे कनेक्शन तोडण्याची नौबत आली नाही. या कालावधीत लातूर महापालिकेवर प्रशासक आहे.

महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या नेतृत्वात मागील एक वर्षापासून मालमत्ताधारकांना कराचा

भरणा करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. वेळप्रसंगी जप्ती, सील करण्यासारखे कठोर निर्णय घेण्यात आले. करावरील व्याजात माफी देण्यात आली. कर भरणाऱ्यांना लॉटरी पध्दतीने बक्षीसे देण्यात आली. यामुळे यावर्षी वर्षाअखेरपूर्वीच तब्बल ७५ कोटींच्या घरात वसुलीचा आकडा सरकू लागला आहे. यामुळे महापालिकेला स्वतःच्या आर्थिक गरजा भागविण्यासोबतच लातूरकरांच्या मूलभूत गरजा पूर्ण करता येणार आहेत. उर्वरित निधी विकासकामांवरही खर्च करता येणार आहे. लातूर महापालिकेकडे मालमत्ता कराव्यतिरिक्त दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. अशातच लातूरकरांना कराचा भरणा करण्याची सवय नव्हती. नगरपरिषद असतानापासून अनेक करदात्यांनी कराचा भरणा केला नव्हता. परंतु, असे सर्वच करदाते थकबाकीदार शोधून महापालिकेने त्यांना नोटिसा पाठविल्या. काहींवर पालिकेने कारवाईचा बडगा उगारल्याने वसुली होत आहे.

# सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** समाजात कोणताही बदल सहजासहजी घडत नसतो, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावीच लागते असे प्रतिपादन श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिराचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारपीठावर उद्घाटक आम्ही सेवकचे संस्थापक प्रा. रवी बापटले, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे, संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत बिरादार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रो. डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आणि प्रा. मनोज मोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, प्रा. रवी बापटले यांनी सेवालयाच्या माध्यमातून पडीक, खडकाळ आणि बंजर जमिनीत टोकाच्या संघर्षातून नंदनवन उभे केले आहे.

त्यांनी अनेक वेळा हाल अपेष्टा सहन करून समाज आणि कुटुंबाचा रोष पत्करून केवळ एचआयव्हीग्रस्त मुलांच्या कल्याणासाठी अहोरात्र कष्ट करून ते आज ८५ मुलांमुलीचे आधारवड बनले आहे असे सांगून त्यांनी हॅप्पी व्हिलेजला एक लाख रुपयांची देणगी जाहीर सुद्धा केली. उपस्थित सर्वांनी उभे राहून त्यांचे टाळ्या वाजवून स्वागत केले.

उद्घाटक म्हणून बोलताना प्रा. रवी बापटले म्हणाले की, रुग्णांचे केवळ आरोग्य न सुधारतात त्यांचे शिक्षण, स्वयंरोजगार, स्वच्छता, व्यवसायिक शिक्षण, परिवार याही गोष्टीवरही लक्ष देणे गरजेचे असते. अलीकडच्या काळात समजाच्या संवेदना हरवत आहेत, त्यामुळे रासेयोच्या विद्यार्थ्यांना सेवेसाठी सेवालयासारख्या संस्था दाखवल्या पाहिजे. आयुष्य हे खूप सुंदर असते. आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटाशी झुंज देऊन नवा इतिहास घडवला पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे आणि स्वागतपर मनोगत प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई यांनी व्यक्त केले, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी केले. सूत्रसंचालन ऋतुजा भिसे आणि जयश्री भंडे यांनी केले. स्वागत गीत शिवाली मुकडे हिने सादर केले तर आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी सेवालालयाच्या विविध महत्त्वपूर्ण उपक्रमांची माहिती घेऊन प्राचार्य, आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या समवेत हॅप्पी व्हिलेज येथील शेतामध्ये ऊस लागवड सुद्धा केली.

# इंटरनेटच्या युगातही मुद्रण व्यवहार टिकून

## ज्येष्ठ समीक्षक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -** वाचनामुळे ज्ञान मिळते. ज्ञानात परिवर्तनाची मोठी ताकद आहे. इंटरनेटच्या जमान्यातही मुद्रण व्यवहार टिकून आहे. छापील पुस्तके वाचण्याचा आनंदच खूप वेगळा असतो. डिजिटल माध्यमातून वाचन संस्काराचे क्षेत्र दिवसेंदिवस विकसित होत आहे. याचे महत्त्व ओळखून प्रत्येक घरात मुलांवर वाचन संस्कार होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी केले.

राज्य शासनचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत येथील कम्युनिटी हॉलमध्ये आयोजित 'लातूर ग्रंथोत्सव'च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील, साहित्यिक डॉ. जयद्रथ जाधव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर उपस्थित होते.



यावेळी डॉ. रणसुभे म्हणाले, लहान वयात लागलेली वाचनाची सवय जीवनाचा एक भाग बनते. त्यामुळे नव्या पिढीसाठी प्रत्येक घरात ग्रंथालय असावे. ज्ञान ही सर्वात मोठी शक्ती आहे. संस्कृती, इतिहास, समाज आणि राष्ट्र समजून घेण्यासाठी वाचन आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात शालेय विद्यार्थ्यांचा 'मला आवडलेले पुस्तक' हा परिसंवाद घेण्यात आला.

यात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या ग्रंथांविषयीची धाडसाने मते मांडली. साहित्यिक अनंत कदम यांच्या अध्यतेखाली हा परिसंवाद झाला. यात केशवराज विद्यालयाची भक्ती गरड, आनंदी स्वामी, अनंतपाळ नूतन विद्यालयाची सानिया चिस्ती, वासनगावच्या गणेश विद्यालयाची ज्ञानेश्वरी जाधव, रामनाथ विद्यालयाच्या प्रशांत कुंभार, मुक्तेश्वर विद्यालयाच्या तन्वी जवादे, निलंगा येथील महाराष्ट्र विद्यालयाचा प्रथमेश क्षीरसागर, आकांक्षा शिंदे, ज्ञानेश्वर विद्यालयाचा भीमांशकर आरदवाड, किरण भंडारे, जवळगा येथील गुरुदत्त विद्यालयाचा अनिरुध्द पाटील यांनी सहभाग घेतला. त्यांना संविधान उद्देशिकेची प्रत व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन वैशाली दुरुगकर यांनी केले.

संजय बाबळसुरे यांनी आभार मानले. आपल्या बोलण्याची भाषा जगण्यात आली, तर मराठीला अधिक चांगले दिवस येतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शेषराव मोहिते यांनी केले. माझी मराठी अभिजात मराठी या विषयावरील परिसंवादाच्या अध्यक्षपदावरुन ते बोलत होते. यावेळी डॉ. ज्ञानदेव राऊत, पत्रकार प्रदीप नणंदकर, अनिता येलमाटे, योगीराज माने उपस्थित होते.




# पांगरा ग्रामपंचायत ग्रामसेविका यांना धमक्या दिल्याने उपसरपंच सह दोघांवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ मार्च : पैठण तालुक्यातील पांगरा ग्रामपंचायत उपसरपंच सह दोन जणांवर बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की पांगरा ग्रामपंचायत कार्यालय येथील ग्रामसेविका छाया उत्तमराव जाधव वय ४० वर्ष रा रांजणगाव शेणपुंजी ता.गंगापूर यांनी दि १८ मार्च रोजी बिडकीन पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की पांगरा ग्रामपंचायत उपसरपंच तय्यब नबी पठाण रा. पांगरा व ग्रामपंचायत महिला सरपंच यांचा मुलगा दत्ता कचरु लाड रा.पांगरा,सलमान अय्युब शेख रा.चितेगाव तिघांनी जातीमुळे हेतुपुरस्सर कायदेशीररीत्या कामकाज करु देत नाही तसेच खोटे नाटे कामे करण्यासाठी माझ्यावर वारंवार दबाव आणतात जसे की विना टॅडरची कामे करा, आम्ही ज्या लोकांकडून कर्ज घेतले आहे त्यांच्याच नावाने कामे घ्या, आम्ही म्हणू तिथेच सह्या करा ,मी त्यांची चुकीची कामे एकली नाही म्हणून उपसरपंच सह वरील दोघांनी मिळून यांनी वरीष्ठ कार्यालय पंचायत समितीकडे माझ्या विरोधात खोट्या तोंडी तक्रारी केल्या,परंतु हे लोक मी ग्रामपंचायत कार्यालयात एकटी कार्यालयीन कामकाज करीत असताना मला जातीवाचक बोलतात तुम्ही महार जातीचे लोक आमचे काही वाकडे करू शकत नाही, त्यातही तुम्ही महीला आहात तुम्ही महार लोक खुर्चीवर बसल्यामुळे आम्हांला कमाई करता येत नाही, त्यामुळे आम्ही तुमच्या विरुद्ध खोटया-नाट्या तक्रारी करुन तुमची बदली करु त्यानुसार त्यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती पैठण यांचे मार्फत दि १६ डिसेंबर रोजी माझी पांगरा येथून बदली पण केली होती,सलमान अय्युब शेख हा चितेगाव येथील रहिवासी असून सुद्धा तरीही पांगरा ग्रामपंचायत मध्ये त्यांचा पुर्ण हस्तक्षेप आहे,जसे की त्यांचे म्हणणे आहे की त्याने उपसरपंच तय्यब नबी पठाण व सरपंच यांचा मुलगा दत्ता लाड, यांना व्याजाने पैसे दिले आहे ते फेडण्यासाठी तुम्हाला ग्रामपंचायतीतुन बेकायदिशीर चेक द्यावे लागतील,जसे की काम न करता चेक दिल्यास ते माझे पैसे फेडतील, पंचायत समिती स्तरावर तक्रारी बाबत कुठलीही खात्री न करता नुसत्या फोनवरही बदली करतात हा माझा अनुभव आहे, तसेच विधानसभा निवडणुक आचारसंहिता लागू असताना उपसरपंच यांनी विना टेंडर सिमेंट रोडचे काम चालू केले होते,मी ते काम बंद पाडले, वरील तिन्ही लोक मी ग्रामपंचायतीतील कार्यालयीन कामकाज करीत असताना व एकटी असताना जातीवरुन तु महार आहेत व तुला येथे कामच करु देणार नाही असे म्हणुन जातीवरुन शिव्या दिल्या व मला धमकीही दिली, आम्ही तुला महीला आणुन मारहाण करु,व खुन करुनही काहीच होत नाही, मी वरील तिघांना वारंवार समजवण्याचा प्रयत्न केला तरीही यांचा तिघेही गैर फायदाच घेतला आहे, अशी तक्रार पांगरा ग्रामपंचायत ग्रामसेविका छाया जाधव यांनी बिडकीन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे या वरुन तिघा विरूद्ध गुन्हा कमल २२१, ३५२,३५१(२) ३(१)(आर),३(१)(एम) ३(१)(एस) प्रमाण गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, बीट जमादार आप्पासाहेब माळी पुढील तपास करीत आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७४) मै नही तू ही

एकदा धर्मयुगच्या संपादकांनी अनेक गणमान्य व्यक्तींना अपने 'जीवन का ध्येय' या विषयावर लिखाण मागितले. कोणी एक पान कोणी दोन तीन चार पाने लिहून पाठवली. पण गुरुजींनी आपल्या जीवनाचे ध्येय लिहिले होते मै नही तू ही यातील तू चा अर्थ आहे, संघ-समाज ईश्वर गुरुजी या तिघांना तू मध्ये एकरूप करतच पुढचे पाऊल टाकायचे गुरुजी तिघांची सेवा करत होते. या तू मध्ये विसंगती नव्हती, विरोध नव्हता, एकही साधे सब सधे; या उक्तीप्रमाणे संघाची साधना, संपूर्ण समाज व राष्ट्राची साधना ईश्वरीय कार्य आहे असे ते व्रतधारी होते. गुरुजी म्हणत डॉक्टरांनी एकमात्र संघाच्या वटवृक्षाचे बीज पेरले आहे. आता उत्तम साधना करून सर्वांनी मिळून या वटवृक्षाला पाने-फांद्या-फुल आणि फळ याचा बहर आणू या. 'मै नही तू ही' असे ध्येय ही त्यांची जीवनश्रद्धा होती. भारत मातेची भक्तीमय सेवा, गुरुजींच्या मनात पूर्ण समर्पण भावानी आलोकित होती. ३३ वर्षाचे अखंडित तपस्वी जीवन, मातृभूमीच्या कल्याणासाठी स्वयंसेवक बनून राहण्याची दृढ इच्छा, आणि ही इच्छा परिपूर्ण करण्यासाठी अखंड प्रयास गुरुजी करत होते. श्री गुरुजी एक व्यक्ती नव्हते तर व्यक्तित्व होते. ते मानवतेचा दृष्टिकोन होते. त्यांनी हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हा मूलमंत्र भारतालाच नव्हे तर जगाला दिला. आज प्रत्येकाच्या हृदयात लोकमान्य स्वातंत्र्यवीर नेताजी या उपाधी प्रमाणेच गुरुजी हे नाव विराजमान आहे. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## प्रा.श्रीकृष्ण परिहार उत्कृष्ट करिअर कट्टा तालुका समन्वयक पुरस्काराने सन्मानित



सोयगाव,दि.२४ मार्च : अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील प्रा.श्रीकृष्ण परिहार यांनी दळणवळणाच्या दृष्टीने आजही सुविधा नसलेल्या सोयगाव सारख्या डोंगराळ तालुक्यात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला जात असलेला करिअर कट्टा या उपक्रमात तालुक्यातील विद्यार्थ्यांची सर्वाधिक नोंदणी करण्यासाठी परिश्रम घेतले. त्याबद्दल त्यांना उत्कृष्ट करिअर कट्टा तालुका समन्वयक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.करिअर कट्टा ऑनलाईन उपक्रमाच्या माध्यमातून सोयगाव परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे व उद्योजकतेचे मोफत मार्गदर्शन मिळत आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्यांच्या या यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,करिअर कट्टा समन्वयक डॉ.विनोद बारोटे,डॉ.ज्योती आदाने, डॉ.मनोजकुमार चोपडे,पदव्युत्तर समन्वयक डॉ.सी.यू.भोरे, डॉ.रामेश्वर मगर,कनिष्ठ विभागप्रमुख डॉ. उल्हास पाटील, अधीक्षक पंकज साबळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## लोककलावंत विष्णू मापारी सोयगांवकर यांना कलारत्न पुरस्कार प्रदान



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ मार्च

सोयगाव येथील प्रसिद्ध लोककलावंत तथा समाज प्रबोधनकार विष्णू मापारी यांना आद्य क्रांतिगुरू बहुउद्देशिय सेवाभावी संस्था गुंधा ता.लोणार जि.बुलढाणा यांचे वतीने दि.२२ शनिवार रोजी आद्य क्रांतीगुरु लहुजी साळवे यांचे स्मृती दिनानिमित्त राज्यस्तरीय कलारत्न सन्मानाने ह.भ.प. डॉ.भगवान बाबा आनंदगडकर महाराज यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी डॉ.सचिन साबळे (सिल्लोड),रमेश थोरात अध्यक्ष पुरस्कार निवड समिती,संस्था अध्यक्ष शंकर मानवतकर यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्री नटराज पंचरंगी लोककला पथक च्या माध्यमातून लोककलावंत मापारी यांनी व्यसनमुक्ती,बेटी बचाव-बेटी पढाव,पर्यावरण रक्षण,पाणी आडवा झाडे वाढवा, प्लास्टिकवर बहिष्कार,वनसवंर्धन स्वीकार,सामाजिक एकात्मता,महिला सबलिकारण या विषयावर अंभई ते मुंबई,गल्ली ते दिल्ली पर्यंत सोंगीभारूड पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रमातून समाज प्रबोधन करीत आहे. त्याना कलारत्न पुरस्कार मिळाले बद्दल सोयगावात युवक, ग्रामस्थ,महिला मंडळ यांनी मिठाई वाटून आनंद साजरा केला.आरोयदूत दिगांबर वाघ,बापू म्हके,दत्ता वाघ, नगरसेवक दीपक पगारे,राउफ शेख,किशोर मापारी,अमोल मापारी,गजानन कुडके,नगरसेवक संदिप सुरडकर,पत्रकार योगेश पाटील,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन योगेश बोखारे,रविंद्र काटोले,विजय चौधरी,बाळू शिंदे,राजू दुतोंडे,शेख सुलेमान,कविवर्य सोनाजी मिसाळ,डॉ.पाटील,समाजसेवक संजय शहापूरकर,अरुण सोहनी,संजय बोरसे,शाहीर अशोक इंगळे,अनिल इंगळे, विशाल घन,कृष्णा शेवाळकर,प्रभाकर महाराज धनगर यांनी अभिनंदन केले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 280/2025

लक्ष्मीबाई भागीनाथ दिवटे व इतर
विरूध्द
निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी मयत भागीनाथ आसाराम दिवटे हे दि. १५/०७/१९९५ रोजी मौजे जामगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. लक्ष्मीबाई भागीनाथ दिवटे, २. रमेश भागीनाथ दिवटे, ३. अशोक भागीनाथ दिवटे, अर्जदार नं. १ ते ३ रा.जामगाव, ता. गंगापुर जि.औरगाबाद ४. सौ. अनिता भ्र.शेषराव चव्हाण, रा. भिवधानोरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यानी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२४/०३/२०२५

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## हायर सादर करत आहेत एआय क्लायमेट कंट्रोल एअर कंडिशनर्स

छत्रपती संभाजीनगर - उन्हाळ्याला सुरुवात झाल्याने हायर इंडिया या जगातिक पातळीवर मेजर अप्लायन्सेसमध्ये सलग १६ वर्षे अव्वल क्रमांकावर असलेल्या ब्रँडने एआय समर्थित एअर कंडिशनर्सची नवी रेंज सादर केली आहे. भारतीय घरांमध्ये वैयक्तिक स्वरुपाचे आणि इंटेलिजंट कुलिंग मिळावे या उद्देशाने ही नवी रेंज तयार करण्यात आली आहे. भारतातील एकमेव एआय क्लायमेट कंट्रोलने सज्ज हे नवे एसी वापरकर्त्यांचे प्राधान्यक्रम आणि वातावरणीय स्थिती यानुसार आपोआप बदल करतात आणि त्यामुळे कमाल ऊर्जा क्षमतेसोबत सहजगत्या अप्रतिम गारवा मिळतो. हायरच्या एआय क्लायमेट कंट्रोल तंत्रज्ञानाने अत्यंत बुद्धिमान पद्धतीने वापरकर्त्यांचे प्राधान्यक्रम जाणून घेणे, कुलिंग सेटिंग्स ॲडजस्ट करणे आणि सहजसुंदर अनुभवासाठी ऊर्जा परिणामकारकता वाढवणे यातून एअर कंडिशनिंग क्षेत्रात नवी क्रांती केली आहे.

## पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत उपक्रमांसाठीची आपली कटिबद्धता

छत्रपती संभाजीनगर -संपूर्ण जग 'जागतिक वन दिन' आणि 'जागतिक जल दिन' साजरा करत असताना, टोयोटा किर्लोस्कर मोटर म्हणजेच टीकेएमने पर्यावरण संवर्धनासाठी आपली कटिबद्धता पुन्हा एकदा दृढ केली आहे. टोयोटाच्या 'ग्लोबल टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५०' (टीईसी २०५०) या दृष्टीकोनात, 'शून्य पर्यावरणीय परिणामाच्या पुढे जाऊन, निव्वळ सकारात्मक परिणाम साध्य करण्याच्या' सहा महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांचा समावेश आहे. यात पाण्याचा वापर कमी करणे आणि पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करणे तसेच भविष्यात निसर्गाशी सुसंगत समाज निर्माण करण्याचा समावेश आहे हा उपक्रम २०१५ मध्ये सुरु झाला आणि तेव्हापासून टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० ही संकल्पना कंपनीच्या शाश्वत उपक्रमांना दिशा देत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करणे, संसाधनांची कमी होणारी उपलब्धता, पाणीटंचाई आणि जैवविविधतेचा ऱ्हास यासारख्या गंभीर आव्हानांना तोंड देत पृथ्वीची परिसंस्था पुनर्संचयित करण्याच्या दिशेने कंपनी योगदान देत आहे. कंपनीच्या वचनबद्धतेच्या केंद्रस्थानी 'पर्यावरणाचा सन्मान' हे मूलभूत तत्त्वज्ञान आहे, पर्यावरणीय प्रभाव कमी करत परिसंस्था आणि स्थानिक समुदाय समृद्ध करण्यासाठी कंपनीला प्रेरित करत राहते.

## नवीन शैक्षणिक धोरणाचा विद्यार्थ्यांनी अंगीकार करावा : प्रा. निलेश गाडेकर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ मार्च

नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणामध्ये नवनवीन बदल झालेले आहेत याबद्दल या बदलाला विद्यार्थ्यांनी स्वीकारून अंतर्गत मूल्यमापन व बहिस्थ मूल्यमापन याद्वारे सर्जनशील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे असे आवाहन डॉ.निलेश गाडेकर यांनी केले ते संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे अंतर्गत मूल्यमापन कार्यशाळेत बोलत होते प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास समन्वयक डॉ.प्रमोद पवार मराठी विभाग प्रमुख डॉ.दिलीप बिरुटे,डॉ.भास्कर टेकाळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.एन.ए.पी.२०-२० ट्वेंटी-ट्वेंटी चा स्वीकार करून नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांनी मूल्यांची जोपासना करणे आवश्यक आहे त्यासाठी अंतर्गत मूल्यमापन व स्किल इन्व्हेस्टमेंट याकरिता नव तंत्रज्ञानाच्या आधारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या तंत्राचा अवलंब करून नवीन शैक्षणिक धोरणाला काळा बरोबर घेऊन जावा व उच्च शिक्षणातील बदलत्या धोरणानुसार मूल्यांकनाची व्याप्ती अंगीकृत करून नवीन शैक्षणिक धोरणानुसार अंतर्गत मूल्यमापनाकरिता फीड प्रोजेक्ट हेल्थ अवरनेस टुरिझम भारतीय संविधान यावा अशा विविध उपक्रमशील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी जागृत राहणे गरजेचे आहे याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्वक शिक्षण घेण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर कार्यरत राहावे असे आव्हान त्यांनी केले.याप्रसंगी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.विक्रम भुतेकर,डॉ.श्रीकृष्ण परिहार,प्रा. उमेश वामने,प्रा.ज्योती स्वामी,डॉ.रमेश औताडे,डॉ.गोविंद वाघमारे,डॉ.सैराज तडवी,डॉ.निलेश गावडे,डॉ.सुशील जावळे यांनी सहकार्य केले.

**AHILYANAGAR MUNICIPAL CORPORATION**
**AHILYANAGAR**

**AMC FUND - Year 2024-25**
**E - Tender Notice No.: 252 & 253 - year 2024-25**
**TENDER ID NO. 1163494 & 1163514**

E Tender notice no. 252 & 253 for Year 2024-25 has been published on the website http://mahaetenders.gov. in for online bidding through e-tender mode.

However, it should be noted those concerned.

**City Engineer**
**Ahilyanagar Municipal Corporation**
**Ahilyanagar**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, माझे पक्षकार नामे श्री.संदीप जुगलकिशोर अग्रवाल रा.पाचोरा ता.पाचोरा जि.जळगांव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस या जाहीर प्रगटना द्वारे सूचित करण्यात येते कि, तुकडी जि.छ.संभाजीनगर, पोट तुकडी ता.सोयगांव पैकी उमरविहीरे' येथील शेत गट नंबर ९६ क्षेत्रफळ २ हेक्टर ८२ आर + पो.ख. ० हेक्टर ०१ आर असे एकूण क्षेत्रफळ २ हेक्टर ८३ आर आकार ०५ रूपये ६० पैसे शेतजमीनी पैकी क्षेत्रफळ १ हेक्टर ०१ आर, आकार २ रूपये ०१ पैसेची शेतजमिन, यात असलेले एक विहीर, पाणी इले, मोटार यांचे पुर्ण सोळा आणे मालकी हक्कासह, तदंगभूत वस्तूंसह, व संपूर्ण हक्कांसह त्यातील झाडां झुडपांसह शेतजमिन जिच्या चतुर्सिमाः- पुर्वेस-श्री.रमेश विष्णु भुसारे यांची शेतजमीन, पश्चिमेसः- नाला, दक्षिणेसः- श्रीमती पदमाबाई सुभाष पाटील व ईतर यांची शेत जमीन, व उत्तरेसः- श्री.प्रसन्न अशोक देशमूख यांची शेतजमीन,येणेप्रमाणे चतुर्सिमेच्या आतील शेत जमिनीची जमीन मालक श्री. विठ्ठल निमराज एरंडे व श्री.सुकलाल विठ्ठल खामकर दोघे रा.मोंढाळा ता.पाचोरा जि. जळगांव यांनी माझे पक्षकारासोबत विक्रीचा सौदा दिनांक ०८/०१/२०२५ रोजी केलेला आहे.त्या प्रमाण माझे पक्षकार हे उपरोक्त चतुर्सिमेच्या आतील शेत जमिनीचे जमीन मालक यांचेकडून दुय्यम निबंधक कार्यालय सोयगांव येथे खरेदीखत नोंदवून घेणार आहेत.

तरी या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराबाबत आपणास कुणालाही आक्षेप अगर उजर / तक्रार असल्यास सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ (सात) दिवसांच्या आत समक्ष हजर होऊन कागदपत्रांसह लेखी आक्षेप, उजर नोंदवावा. व त्याची पोच घ्यावी.

तसेच मुदतीत कोणाचाही उजर/तक्रार, आक्षेप आला नाही, तर जाहीर प्रगटनातील सदर नोंदणीकृत खरेदी खताचा व्यवहार निर्विवाद व दोषमुक्त समजण्यात येईल. तसेच सदर मुदतीनंतर आलेला आक्षेप, उजर/तक्रार माझे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही याचीनोंद घ्यावी.

दिनांक - २३/०३/२०२ — पक्षकाराची सही
मार्फत — श्री.संदीप जुगलकिशोर अग्रवाल
ॲड.एस.पी.सूर्यवंशी
मो.नं.-९८२३१८६१७४
रा.किन्ही, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद
कार्यालाचा पत्ता- बसस्टँड जवळ,सोयगाव,
ता.सोयगाव, जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. बी. इंगोले, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. २८१/२०२५

प्रकरणात पुढील तारीख ०५/०५/२०२५

अर्जदार - १) पुष्पा भ्र. कांतीलाल लोहाडे वय ७९ वर्षे, धंदा रा. नरसिंगपुर, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद घरकाम २) ताराबाई भ्र. रतनलाल जैन वय ५७ वर्षे, धंदा घरकाम रा. गोपीनाथ नगर, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - १) मोतीलाल पिता मिश्रीलाल कासलीवाल वय १८ वर्षे, धंदा शेती व मजूरी रा. सावंगी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) उषाबाई भ्र. बन्सीलाल कासलीवाल वय ६५ वर्षे, धंदा घरकाम रा. सिंहगड कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ३) गणेश पिता बन्सीलाल कासलीवाल वय ४६ वर्षे, धंदा मजूरी रा. सिंहगड कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ४) रमेश पिता बन्सीलाल कासलीवाल वय ४२ वर्षे, धंदा मजूरी रा. सिंहगड कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद ५) महेश पिता बन्सीलाल कासलीवाल वय ३७ वर्षे, धंदा मजूरी रा. सिंहगड कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ व २ आणि गैरअर्जदार क्र. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. १ व २ आणि गैरअर्जदार क्रं. १ यांचे वडील, गैरअर्जदार क्रं. २ चे सासरे व गैरअर्जदार क्रं. ३. ते ५ यांचे आजोबा नामे मिश्रीलाल भिकचंद कासलीवाल हे दिनांक २१/०२/२००५ रोजी मौजे सावंगी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे वृध्दपकाळाने मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ व २ आणि गैरअर्जदार क्र. १ यांची आई, गैरअर्जदार क्रं. २ ची सासु आणि गैरअर्जदार क्रं. ३ ते ५ यांची आजी नामे कांताबाई मिश्रीलाल कासलीवाल ह्या दिनांक २६/०१/२०१० रोजी मौजे लासूर स्टेशन, सावंगी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ व २ आणि गैरअर्जदार क्रं. १ यांचा भाऊ, गैरअर्जदार क्रं. २ यांचे पती आणि गैरअर्जदार क्रं. ३ ते ५ यांचे वडील नामे बन्सीलाल मिश्रीलाल कासलीवाल हे दिनांक १९/०३/२०२३ रोजी मौजे एन-६, सिंहगड कॉलनी सिडको, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. मयत मिश्रीलाल भिकचंद कासलीवाल व मयत कांताबाई मिश्रीलाल कासलीवाल यांना अर्जदार क्रं. १ व २ आणि गैरअर्जदार क्रं. १ ते ५ हे कायदेशीर वारसदार असून अर्जदार १ व २ आणि गैरअर्जदार क्रं. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत मिश्रीलाल भिकचंद कासलीवाल व मयत कांताबाई मिश्रीलाल कासलीवाल यांच्या मृत्युमूळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २४/०३/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ४ थे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. २८२/२०२५ — पुढील तारीख २५/०४/२०२५

अर्जदार : १) आवंतिकाबाई भ्र. भानुदास जगताप वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. गोपाळवाडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) शोभा भ्र. दादासाहेब गायकवाड वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. पानवी (बु.) ता. वैजापूर जि. औरंगाबाद ३) दादासाहेब पिता भानूदास जगताप वय ३२ वर्षे, धंदा मजूरी रा. गोपाळवाडी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) देवीदास भ्र. भानुदास जगताप वय २७ वर्षे, धंदा मजूरी रा. गोपाळवाडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड, आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ४ यांचे वडीलनामे भानुदास केशव जगताप हे दिनांक १५/०२/२०२५ रोजी मौजे सिरेसायगांव, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासू सासरे व अर्जदार क्रं. २ ते ४ यांचे आजी आजोबा हे बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत भानुदास केशव जगताप यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ ही विवाहीत मुलगी असून अर्जदार क्रं. ३ व ४ हे मुले या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत भानुदास केशव जगताप यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २४/०३/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटनाचे उत्तर

सर्व जनतेस कळविण्यात येते की, दिनांक १३.०३.२०२५ रोजीच्या दैनिक लोकमत वर्तमानपत्रामध्ये ॲड. एम. एस. सिददीकी रा. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत खालील मिळकती बाबत जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले आहे.

मिळकत :

मौजे चिखलठाण, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर मधील गट क्रमांक २०५ क्षेत्र ० हे.४० आर ज्याची चतूः सिमा-

पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस पंढरीनाथ चव्हाण यांची जमीन,

दक्षिणेस - गोकुळ लहाने यांची ४१ आर जमीन,

उत्तरेस - पंढरीनाथ चव्हाण यांची जमीन,

सदरील मिळकत गोकुळ सांडु लहाने, रा. चिखलठाण, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर यांनी त्रयस्थ इसम यांच्याशी विक्री करार केला असल्याचे व सदरील मिळकत बोजा रहीत कुठेही गहाण, तारण केलेली नसल्याचे सदरील जाहीर प्रगटनामध्ये नमूद करण्यात येऊन उजर आक्षेप मागविण्यात आला आहे, परंतू सदरील मिळकतीचे क्षेत्र ० हे.४० आर व ० हे.४१ आर अशी एकूण. मिळकतीचे क्षेत्र ० हे.८१ आर गोकुळ सांडु लहाने रा. चिखलठाण यांनी माझे आशील बुलढाणा अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी शाखा कन्नड यांच्याकडून रक्कम रुपये २५,००,०००/- कर्ज घेवून सदरील कर्जास वरील मिळकत नोंदणीकृत गहाणखताचे दस्त क्रमांक ६९८, दिनांक २०.०२.२०१७ व ५३३१ दिनांक १८.१०.२०१७ अन्वये गहाण ठेवली असून अदयाप कर्ज बेबाक झालेले नसुन जाहीर प्रगटनामध्ये नमूद केल्यानुसार वरील मिळकत बोजा रहीत नाही.

सबब सदरील जाहीर प्रगटनामध्ये मिळकत खरेदी करणाऱ्याचे नांव प्रसिध्द करण्यात आलेले नसल्यामुळे प्रस्तुत जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील मिळकती मध्ये माझे आशील बुलढाणा अर्बन को-ऑप. सोसायटी शाखा कन्नड यांचा हक्क व अधिकार असून मिळकतीवर असलेला बोजा बेबाक होऊन गहाणखत रदद होत नाही तो पर्यंत कोणीही वरील मिळकती संदर्भात कोणतेही हस्तांतराचे व्यवहार करु नये, तसे केल्यास सदरील व्यवहार माझ्या आशीलावर बंधनकारक राहणार नाही, तसेच जाहीर प्रगटनामध्ये नमूद केल्यानुसार कोणताही बेकायदेशीर व्यवहार केल्यास माझ्या आशीलास नाईलाजास्तव संबंधीता विरुध्द दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करणे भाग होईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०३/२०२५
मार्फत- — माझे आशील
ॲड. एम.एम. भारुका, — बुलढाणा अर्बन को-ऑप..
टिळकरोड, कन्नड, ता. कन्नड — सोसायटी मार्फत व्यवस्थापक
जि. छत्रपती संभाजीनगर,
संपर्कः ९८५२२०४८४८

## जाहीर समन्स

**पाचोरा, जि. जळगांव येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे न्यायालयात**

नियमीत दिवाणी दावा क्र. १०/२०२२

वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स
(दिवाणी प्रक्रिया संहिता नियम क्रमांक ५, नियम १.५)

चौकशी तारीख २९/०३/२०२५

निशाणी क्र. ८०

वादी -श्री. वैभव केशव खाटीक

:: विरुध्द ::

प्रतिवादी - श्री. संभाजी ओंकार धोबी व इतर

प्रति

प्रतिवादी क्र. ७) सौ. लिलाबाई रामचंद्र चौधरी, वय ४८, चंदा घरकाम, रा. रामनगर औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद

ज्याअर्थी, उपरोक्त वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात दावा दाखल केला आहे, आपणांस वारंवार दिलेल्या पत्त्यावर समन्स काढले असता त्याची बजावणी होत नसल्याने वादीने दिलेल्या अर्जावरुन या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणने मांडण्यासाठी दिनांक २९/०३/२०२५ रोजी मध्यान्हपूर्व ११:०० वाजता या न्यायालयात आपण जातीने, किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल किवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे आणि उक्त तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी ज्यांच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा हक्कमागणीच्या पूर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत, तुम्ही, प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांनी नोंद केली पाहिजे..

यापुर्वी नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले,

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय पाचोरा)

## अग्रलेख...

# झळा या लागल्या जीवा...

ऋतुबदल ही नित्याची नैसर्गिक घटना असली, तरी अलिकडे येणारा ऋतू कोणते आक्रित घडवेल, या विचाराने धास्ती वाढण्याजोगी परिस्थिती बघायला मिळते. प्रत्येक ऋतूमध्ये येणारे संकट अधिकाधिक गडद होत असल्यामुळे पावसाळ्यात प्रचंड पावसामुळे होणाऱ्या हानीची, हाडे गोठवणाऱ्या थंडीमुळे सोसाव्या लागणाऱ्या त्रासाची आणि प्रचंड उन्हामुळे होरपळून जाण्याची चिंता हा ऋतुबदलाच्या काळातील एक अनिवार्य भाग ठरतो आहे. तापणाऱ्या उन्हाने यंदाचा उन्हाळा सामान्य नसल्याची जणू सूचनाच दिली आहे. मार्च महिन्यात अनेक भागांमध्ये उन्ह तापू लागले असून तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच पुढचे जवळपास तीन महिने आपली किती होरपळ होईल, हे सांगता येणार नाही. पाणवठे कोरडे पडणे, जनावरांच्या पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न, उष्माघातामुळे होणारे मृत्यू, भाजीपाल्याचा अभाव आणि कडाडणाऱ्या किमती हे आणि यासारखे नानाविध विषय वाढत्या उष्म्याशी संलग्न असल्यामुळे ही दाहकता एकांगी राहत नाही. त्याची धग वा चटके सर्वांगाने आणि सर्वार्थाने जाणवतात. म्हणूनच या वाढत्या दाहामागील कारणांची दखल घेणे गरजेचे ठरते.

यंदाचा उन्हाळा अत्यधिक तीव्रतेमुळे आतापासूनच चर्चेत आहे. तापमान लक्षणीय रीत्या वाढत असल्यामुळे लोकांना असह्य उष्णतेचा अनुभव मिळू लागला आहे. तापमानाची पातळी अल्पावधीतच उच्चतम स्तरावर पोहोचण्याची शंका तज्ज्ञांकडून व्यक्त होत असल्यामुळे अनेक ठिकाणी उष्णतेचा प्रचंड कहर बघायला मिळणार हे जवळपास निश्चित आहे. अशा या तापमानवाढीला अनेक घटक कारणीभूत आहेत. सध्या जगभर चर्चेत असणारे ग्लोबल वार्मिंग अर्थात जागतिक तापमानवाढ हे त्यामागील एक प्रमुख कारण म्हणावे लागेल. सध्या नानाविध कारणांमुळे पृथ्वीवरील सरासरी तापमानवाढ अनुभवाला येत आहे. यामध्ये सर्वाधिक योगदान आहे ते मानवी हस्तक्षेप आणि त्याच्या व्यवहाराचे. आताच्या तंत्र आणि यंत्रयुक्त जगात मानवाकडून होणारे प्रदूषण तसेच कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन प्रचंड प्रमाणात वाढले आहे. यामुळे हवामानात बदल होऊन सामान्यत: गारठा असणाऱ्या काही भागांमध्येदेखील उष्णता निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळेच आता भर उन्हाळ्यात थंड हवेसाठी ओळखली जाणारी ठिकाणे तापताना दिसतात. कार्बन डाय ऑक्साईड हा सर्वांत मोठा ग्रीन हाऊस गॅस आहे. याच्या वाढत्या प्रमाणामुळे उष्णता पृथ्वीच्या पृष्ठभागावर कायम साठून राहते आणि प्रखर सूर्यप्रकाशाची साथ मिळताच उष्णतेची तीव्रता वाढते. परिणामस्वरूप २१ व्या शतकात सुमारे १.५ डिग्री सेल्सिअस तापमानाची वाढ झाली आहे. या वाढीमुळे पाण्याचे वेगाने बाष्पीभवन, पाण्याचे प्रमाण कमी होणे हे परिणाम दिसत असून देशभरात तीव्र उन्हाळा अनुभवायला मिळत आहे. वनीकरणाची कमतरता हादेखील या समस्येशी संबंधित एक महत्त्वाचा घटक आहे. कारण वनस्पती पृथ्वीवर एक प्रकारे कूलिंग एजंट म्हणून काम करतात. झाडे आणि वनस्पती वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि ओलावा निर्माण करतात. यामुळे तापमान नियंत्रित राहते. तथापि, मानवी हस्तक्षेपामुळे जंगलात वृक्षतोड सुरू आहे. विशेषत: भारतात वृक्षतोड अधिक तर वनीकरणाचे प्रमाण गरजेपेक्षा अत्यंत कमी आहे. पाणी संकलनाचे प्रमाण कमी झाल्यामुळे यंदा वातावरण अधिक उष्ण होताना दिसते आहे. ही निश्चितच धोक्याची घंटा म्हणायला हवी. गेल्या काही वर्षांमध्ये शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे. शहरी भागांमध्ये 'हिट आयलंड'चा प्रभाव अधिक दिसतो. म्हणजेच शहरी भागातील तापमान ग्रामीण भागांच्या तुलनेत वाढलेले दिसते. कॉंक्रीट, स्टील आणि इतर बांधकाम साहित्य सूर्यप्रकाश शोषून अधिक उष्णता सोडते. त्याचप्रमाणे यांत्रिक उपकरणे आणि वाहनांच्या उत्सर्जनातून तयार होणारी उष्णताही प्रभाव दाखवते. यामुळेच शहरांमध्ये अधिक उष्णता साठवली जाते आणि या साठलेल्या उष्णतेमुळे आसपासचा परिसर जास्त तापतो. दुसरीकडे पाण्याच्या साठवणुकीच्या समस्याही वाढत आहेत. हवामानातील बदलामुळे पाऊस कमी होत आहे. पाऊस झाला तरी अचानक आणि प्रचंड प्रमाणात होतो. यालाच आपण अवकाळी म्हणतो. परिणामी पाण्याच्या साठवणुकीचे आणि व्यवस्थापनाचे मोठे संकट उभे राहिले आहे. जलाशय, नदी आणि जलसाठ्यांमध्ये पाणी कमी होते आणि उन्हाचे चटके तीव्रतेने जाणवतात. कमी पाण्यामुळे वाढलेली उष्णता अधिक कष्टदायक बनते.

वाढत्या उष्णतेमागे वायुप्रदूषण आणि ग्रीन हाऊस गॅसची कारणे ही आधुनिक काळाची देणगीच म्हणावी लागेल. सध्या उद्योग आणि वाहतूक क्षेत्रामुळे वायुप्रदूषण अधिक होते आहे. यामुळे वातावरणातील ग्रीन हाऊस वायूंचे प्रमाणही वाढते. विशेषत: कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि नायट्रस ऑक्साईडसारख्या वायूंचे प्रचंड उत्सर्जन होते आहे. यामुळेही उष्णता साठून राहण्यास मदत होते आणि पृथ्वीवरील तापमान वाढते. याचा थेट परिणाम उष्णतेच्या वाढत्या प्रकोपाच्या रूपाने आपल्याला अनुभवायला मिळतो. हे सर्व लक्षात घेता वायुप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच जलवायू बदलावर कारवाई करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय करार झाले आहेत. 'पॅरिस करार' हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. या कराराचा उद्देश जलवायू बदलावर नियंत्रण ठेवणे हा आहे. त्यात सहभागी देशांनी २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जन कमी करणार असल्याचे वचन दिले आहे. तथापि, त्याच्या अंमलबजावणीपुढेही अनेक आव्हाने आणि समस्या आहेत. त्यामुळेच जलवायू बदलावर नियंत्रण ठेवणे हा सध्या जटिल प्रश्न होऊन बसला आहे. या सगळ्यांचा परामर्श घेता यंदाच्या तलखीसाठी आपण तयार राहायला हवे. कारण जटिल प्रश्नांचा हा गुंता इतक्यात सुटण्याची अपेक्षा धरणे मूर्खपणाचे ठरेल. मानवी सहनशक्तीच्या पलीकडे उष्णता वाढल्यास आरोग्य आणि जीवनशैलीवर मोठे परिणाम होतात. आताच स्ट्रोक, हृदयरोग आणि रक्तदाब यासारख्या समस्या वाढत आहेत. विशेषत: वृद्ध, लहान मुले आणि विकलांग व्यक्तींना याचा अधिक त्रास होताना दिसत आहे. असह्य उष्णतेमुळे कृषी क्षेत्रावरही परिणाम होतो. परिणामी, महागाई भरमसाट वाढते आणि अर्थसंकट गडद होते. अशा सर्व विपरीत परिस्थितीला तोंड देण्याची तयारी आतापासून करायला हवी. अलिकडेच ताज्या संशोधनात सिद्ध झाले आहे की, येत्या काळात जलवायू बदलामुळे वादळे आणि टायफूनसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते. या प्रकारच्या वादळांमध्ये जास्त तीव्रता आणि वारंवारता दिसून येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. उदाहरणार्थ २०२५ च्या वसंत ऋतूमध्ये एकीकडे उष्णतेचा प्रकोप दिसेल तर काही ठिकाणी प्रचंड चक्रीवादळे आणि बर्फवृष्टीही होईल, असा संशोधकांचा अंदाज आहे. म्हणजेच येत्या काळात हवामानातील अस्थिरता वाढणार आहे. या प्रकारच्या वादळांमुळे सर्वदूर अत्यधिक उष्णतेचा प्रभाव जाणवू शकतो.

हे सगळे असले तरी उष्णतेच्या लाटेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी 'स्मार्ट सिटी' आणि 'ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चर' आदी योजनांचा वापर महत्त्वाचा ठरू शकतो. यामध्ये रस्त्यांवर अधिक हिरवळ उभी करणे, वृक्षारोपण करणे तसेच इमारतींमध्ये 'ग्रीन रूफ्स'सारख्या उपायांचा समावेश आहे. यामुळे शहरी भागांमध्ये तापमान कमी होऊ शकेल. खेरीज हवामानावर प्रभाव टाकणाऱ्या 'सौर ऊर्जा' आणि 'पाणी संकलन पद्धती' आदी नवतंत्रज्ञानाचा वापर करूनही वाढत्या उष्णतेच्या समस्येवर उपाय शोधला जाऊ शकतो. एका ताज्या संशोधनातून सौर क्रिया, सौर वारा आणि चंद्राची गतीदेखील पृथ्वीवरील तापमानावर प्रभाव टाकत असल्याचे दिसून आले आहे. सौर क्रिया आणि चंद्राच्या आकर्षणामुळे पृथ्वीवरील तापमानवाढीच्या प्रमाणात बदल होऊ शकतो, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. त्यामुळेही या काळात तापमान बदलाचे वेगवेगळे परिणाम दाखवू शकतात. थोडक्यात सध्याची वाढती उष्णता केवळ प्रदूषण आणि उद्योगांशीच संबंधित नाही तर त्यामागील अनेक बारीकसारीक घटकांचाही विचार करणे गरजेचे आहे. ग्लोबल वार्मिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी नानाविध उपाय आणि जागतिक सहकार्य आवश्यक आहे. ते मिळाले आणि माणसाने जीवनशैलीत योग्य ते बदल घडवून आणले तरच कदाचित या झळांपासून आपले रक्षण होऊ शकेल. अन्यथा, होरपळ अटळ आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**


# केजरीवाल आता सुपर मुख्यमंत्री!

दिल्लीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यानंतर आपचे नेते अरविंद केजरीवाल पंजाबमध्ये विपश्यना करण्यासाठी निघून गेले. होशियारपूरमध्ये १० दिवस विपश्यना केल्यानंतर केजरीवाल यांनी राजकारणात पुन्हा सक्रिय होण्याची घोषणा केली असून, ते आता पंजाबचे 'सुपर मुख्यमंत्री' म्हणून काम करणार आहेत.

पंजाबमध्ये, मुख्यमंत्री भगवंत मान यांना बदलण्याची मागणी केजरीवालनिष्ठ आमदार करीत आहेत हे येथे उल्लेखनीय. केजरीवाल यांनी स्वत: मात्र पंजाबमध्ये नेतृत्वबदल होणार नाही, मान यांच्याच नेतृत्वाखाली राज्यात विधानसभा निवडणुका होतील हे स्पष्ट केले असले तरी ते स्वत: राज्यात अधिक सक्रिय राहण्याची चिन्हे आहेत. राज्य विधानसभेचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला असून, निवडणुका होण्यास अद्याप दोन वर्षे बाकी आहेत. या काळात केजरीवाल जास्तीत जास्त काळ पंजाबमध्ये राहतील असे दिसते. पंजाबमधूनच ते राज्यसभेवर निवडून जाणार आहेत. हे निमित्त साधून ते राज्य सरकारच्या कामात जास्तीत जास्त हस्तक्षेप करतील असे दिसते.

**नजर पंजाबवरच** : दिल्लीचा मुख्यमंत्री असतानाही केजरीवाल यांचे लक्ष पंजाबकडे अधिक होते. वास्तविक त्यांना तर पंजाबचे मुख्यमंत्रिपदच हवे होते. पण, शीखबहुल राज्य आपल्याला मुख्यमंत्री म्हणून स्वीकारणार नाही याची कल्पना आल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रिपद भगवंत मान यांच्याकडे सोपविले. दिल्लीचा मुख्यमंत्री नामधारी आहे हे त्यांच्या लक्षात आले होते. प्रत्यक्षात सारी सत्तासूत्रे नायब राज्यपालांकडे देण्यात आली आहेत. तसा कायदाच संसदेत पारित करण्यात आला आहे. पंजाबमध्ये मात्र तसे नाही. राज्य सरकारला सारे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. याचा फायदा उठवीत केजरीवाल यांनी पंजाब सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचे धोरण पूर्वीपासून स्वीकारले आहे. मुख्यमंत्री मान यांच्या उपस्थितीत सरकारी अधिकाऱ्यांच्या बैठका घेईपर्यंत त्यांची मजल गेली होती.

**सिसोदियांच्या अटकेनंतर** : दिल्लीचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्याकडे दिल्लीचा कारभार सोपवून देशात व पंजाबमध्ये आपले हातपाय पसरण्याचे धोरण केजरीवाल यांनी स्वीकारले होते. पण सिसोदिया यांना मद्य घोटाळ्यात अटक झाल्यानंतर केजरीवाल यांना नाईलाजाने दिल्लीतील आपले वास्तव्य वाढवावे लागले. नंतर तर केजरीवाल यांनाही अटक झाली. त्यांना दिल्लीच्याच तिहारमध्ये ठेवण्यात आले होते. आणि त्याची सुटका होत असताना, दिल्लीत विधानसभा निवडणुका फार जवळ आल्या होत्या. निवडणुका घोषित झाल्या. केजरीवाल यांना पंजाब वा इतर राज्यांत फार हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली नाही.



**राजकीय बेरोजगार** : दिल्लीतील पराभवाने केजरीवाल यांना अक्षरश: बेरोजगार केले असून, विपश्यना करण्याच्या नावाखाली त्यांनी पंजाबमध्ये १५ दिवसांचा मुक्काम ठोकला. सरकारी सोयी सवलतींच्या सान्निध्यात त्यांनी १० दिवसांची विपश्यना केली असे सांगितले जात असले तरी या काळातही ते आपल्या नेत्यांना- आमदारांना भेटत होते. यातून त्यांनीच राज्यात नेतृत्वबदल करण्याची चर्चा सुरू केली असे समजते. पण, आता मुख्यमंत्री भगवंत मान यांना बदलणे सोपे नाही. तसा प्रयत्न केल्यास राज्यात आम आदमी पक्षाचे दोन तुकडे होऊ शकतात. केजरीवाल यांनाही याची कल्पना असल्याने त्यांनी नेतृत्वबदल न करता राज्याचे 'सुपर मुख्यमंत्री' होण्याचे ठरविले असल्याचे समजते. सर्व महत्त्वाचे निर्णय ते करणार आहेत असेही त्यांच्या गोटातून सांगितले जाते. मुख्यमंत्री मान यास फार विरोध करू शकणार नाहीत असे मानले जाते. कारण, त्यांना एक प्रशासक म्हणून आपला कोणताही प्रभाव राज्य प्रशासनावर सोडता आलेला नाही. याउलट केजरीवाल यांनी त्यांना एक मुलकी अधिकारी म्हणून असलेल्या अनुभवाचा फायदा उठवीत दिल्लीच्या कामकाजावर आपला एक ठसा उमटविला होता. तसाच प्रयत्न ते आता पंजाबमध्ये करणार आहे.

**पुन्हा नशा** : दिल्लीत केजरीवाल यांचे पानिपत झाले ते मुळी दिल्ली सरकारच्या मद्य घोटाळ्यामुळे. पंजाबमध्ये केजरीवाल यांनी पुन्हा तोच रस्ता धरला आहे. पंजाबमधील युवक मोठ्या प्रमाणावर मादक पदार्थांच्या आहारी गेले असून, त्यांना व्यसनमुक्त करणे आपले मिशन असल्याचे ते वारंवार सांगत आहेत. केजरीवाल पंजाबमधील युवकांच्या व्यसनाबाबत बोलत असले तरी प्रत्यक्षात त्यांना सत्तेचे व्यसन लागले आहे ही वस्तुस्थिती आहे.

**गायब सिसोदिया** : दिल्ली विधानसभेचे निकाल लागून एक महिना उलटला आहे. तरी आपचे नेते त्या धक्क्यातून आणि दु:खातून सावरलेले नाहीत असे दिसते. केजरीवाल यांनी विपश्यना करण्यासाठी पंजाबचा रस्ता धरला असताना, मनीष सिसोदिया हे जवळजवळ निष्क्रिय झाले आहेत. हीच अवस्था आपच्या आणखी काही नेत्यांची आहे.

सध्या संसदेचे अधिवेशन सुरू असल्याने आपचे नेते व राज्यसभा खासदार राघव चड्ढा दिल्लीत आहेत. अधिवेशन आटोपताच ते लंडनचा रस्ता धरतील असे आपमधून सांगितले जाते. चड्ढा यांनी आप सोडण्याचा निर्णय जवळपास पक्का केला असल्याचे समजते. फक्त यासाठी ते योग्य मुद्दा आणि वेळ शोधत असल्याचे आप गोटातून सांगितले जाते.

**चुकीचा निर्णय** : तामिळनाडू सरकारने आपला अर्थसंकल्प सादर करताना त्यातून रुपयाचे चिन्ह हटविले. एक योगायोग म्हणजे रुपयाचे हे चिन्ह एका तामिळ व्यक्तीनेच तयार केले होते. मुख्यमंत्री स्टॅलिन यांचा हा निर्णय पूर्णपणे केवळ अयोग्यच नाही तर घटनाबाह्य, केंद्र- राज्य संबंधांना तडा देणारा असा आहे. तामिळनाडूतील संवेदनशील स्थिती पाहता केंद्र सरकारने याबाबत कोणतीही कारवाई केली नसली तरी राज्य सरकारचे हे कृत्य राज्य सरकार बरखास्त करण्यासाठी पुरेसे होते.

**नवी फेरी** : तामिळनाडूतील स्टॅलिन सरकार व राज्यपाल रवि यांच्यात मागील काही महिन्यांपासून शीतयुद्ध सुरू होते. राज्य विधानसभेने पारित केलेल्या काही विधेयकांना राज्यपालांनी आपली मंजुरी रोखून धरली होती. नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर त्या विधेयकांना मंजुरी देण्यात आली. ते प्रकरण काहीसे निवळले असताना हा नवा वाद उद्‍भवला आहे.

**सरकारिया आयोग** : केंद्र-राज्य संबंधावर विचार करण्यासाठी केंद्र सरकारने फार पूर्वी न्या. सरकारिया यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला होता. आयोगाने काही चांगल्या शिफारशीही केल्या होत्या. मात्र आता आयोगाचा तो अहवाल कालबाह्य झाल्यासारखा असल्याने केंद्र सरकारने या विषयावर नवा आयोग गठित करण्याचा विचार करावा असे एक मत व्यक्त केले जात आहे. काही राज्यांमध्ये केंद्र-राज्य सरकारांचा संघर्ष झडत असला तरी हा संघर्ष एका चौकटीबाहेर जाणे योग्य नसते. तामिळनाडू सरकारचा ताजा निर्णय केंद्र-राज्य संबधांच्या चौकटीत बसणारा नाही. राज्य सरकारने आपल्या अधिकारांचे-मर्यादांचे उल्लंघन केले आहे. मात्र याची पुनरावृत्ती अन्य राज्यांत होऊ नये म्हणून केंद्र सरकारने याबाबत वेळीच काही कारवाई करावी असेही मानले जाते. हे सारे करीत असताना केंद्र-राज्य संबंध नव्याने परिभाषित करण्यासाठी सरकारिया आयोगाच्या धर्तीवर केंद्राने एखादा आयोग नियुक्त केल्यास या आयोगाच्या शिफारशी देशाच्या संघराज्य चौकटीला बळकट करणाऱ्या ठरतील.

## वेध

**हेमंत सालोडकर**

# नको भारनियमन हवे महावितरण

वीज वितरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महावितरणला 'सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनी' पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. त्यामुळे महावितरणकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे हा पुरस्कार दिला जातो. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला असला तरी त्या मागील यशाचे भागीदार अनेक जण आहेत. त्यांचेही हा पुरस्कार मिळण्यात मोठे योगदान आहे. काही वर्षांपूर्वी महावितरणचे आगमन झाले आणि लोकांच्या अपेक्षा, आकांक्षा पूर्ण करण्यात यश मिळवले. पारंपरिक गोष्टींसोबतच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज होत महावितरण मार्गक्रमण करीत आहे.

पूर्वी वीज ग्राहकांची संख्या कमी होती. वीज उत्पादन मुबलक होत असल्याने मागणी त्याप्रमाणे पुरवठा होत होता. ग्राहकही आनंदी होते. पण ग्राहकांच्या खिशात पैसा आला आणि सुखसोई वाढत गेल्याने लोकांनी घरी विजेची अनेक उपकरणे वापरणे सुरू केले. त्यामुळे विजेची मागणी वाढली. त्या तुलनेत वीज उत्पादन अपुरे पडू लागले. परिणामी भारनियमन करणे सुरू झाले. महाराष्ट्रातील लोकांना भारनियमन म्हणजे काय हा प्रकार नवीन होता. त्यामुळे लोकांची नाराजी, संतापाचा सामना महावितरणला करावा लागला. घरगुती उपकरणांप्रमाणेच व्यापार, उद्योग वाढले. नवनवीन कारखाने सुरू झाले. त्यासाठीही विजेची मागणी वाढू लागली. त्यासाठी अतिरिक्त विजेची गरज भासू लागली. शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा आणि रात्री पाण्याची गरज भासू लागली. ती मागणी पूर्ण करता करता वीज वितरण कंपनीच्या नाकी नऊ आले. घरगुती ग्राहक, व्यापारी, उद्योजक, शेतकरी, कारखानदार, लघुउद्योग यांची विजेची मागणी कशी पूर्ण करता येईल याचा विचार होऊ लागला. उन्हाळ्यात होणाऱ्या भारनियमनामुळे लोकांचा संतापाचा उद्रेक व्हायचा. रात्री दहा-पंधरा लोकांचा गट वस्तीतील वीज कार्यालयावर जायचा. या लोकांच्या प्रश्नांना सामोरे जाताना महावितरणच्या कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागायची. काही संतप्त लोक तर कर्मचाऱ्यांना मारहाण करायचे. त्यामुळे अनेकदा प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचायचे. भारनियमनाची समस्या वीजचोरीमुळेही उद्‍भवत होती. अनेक झोपडपट्ट्यांमध्ये अधिकृत वीज मीटर न घेता आकोडे तारांवर टाकून विजेचा सर्रास वापर सुरू होता. झोपडीत मिक्सरपासून एसीपर्यंत सर्व सुखसोई फुकट मिळवण्याचा प्रयत्न होत होता. यावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याचे प्रकार घडले आहेत. त्यातून धडा घेत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी मग पोलिसांची सुरक्षा मिळवत कारवाईला सुरुवात केली. वीज बिल न भरणाऱ्या ग्राहकांची वीज कापण्यात आली. अनेक उच्चभ्रू लोकांनी मोठ्या प्रमाणात वीज बिलांची थकित रक्कम भरली नसताना त्यांच्यावर कारवाई करण्यात येत नव्हती. यानंतर त्यांच्यावरही लगाम कसण्यात आली. आता महावितरणने कात टाकत आधुनिक उपकरणांच्या माध्यमाने आपल्या कर्मचाऱ्यांना सज्ज केले आहे. त्यांची सुरक्षा शिरोधार्य मानून त्याला अग्रक्रम दिला आहे. तसेच ग्राहकांसाठी अधिक सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ऑनलाईन वीज बिल भरता येणे शक्य झाल्यामुळे रांगेत लागून वीज बिल भरण्याची गरज राहिली नाही. बिल भरल्यानंतर लगेच पोचपावती मिळते. ई-मेल, व्हॉट्सॲपचा मेसेज येतो. त्यामुळे महावितरणची विश्वसनीयता वाढली आहे. त्यामुळे आता महावितरणकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहे. भूमिगत वीज वाहिन्या, उच्च दर्जाची रोहित्रे वापरून लोकांना स्वस्त दरात वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

महावितरणने मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच गावांना ऊर्जा स्वयंपूर्ण करण्यासाठी 'सौर ग्राम योजना' सुरू केली असून, आतापर्यंत १० गावे पूर्णतः सौर ऊर्जेवर कार्यरत झाली आहेत. महावितरणची स्वत:ची कार्यालये, वीज उपकेंद्रे आणि ग्राहक सेवा केंद्रांना सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. विद्युत वाहनांसाठी राज्यभर अनेक चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात आली असून, पुण्यातील चार्जिंग स्टेशन थेट सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाशी जोडण्यात आले आहे. यामुळे अक्षय ऊर्जेच्या वापराला चालना मिळत आहे. महावितरणने वितरण यंत्रणेतील सुधारणा, वीज उपकेंद्रे आणि नवीन वीज वाहिन्यांचे जाळे उभारणे, वितरण रोहित्रांची संख्या वाढवणे यावर विशेष भर दिला आहे. शेतकऱ्यांसाठी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' आणली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसाही वीज मिळणार आहे. मात्र आता उन्हाळा असताना लोकांच्या नशिबी भारनियमनाचे जुने त्रासदायक दिवस पाहण्याचे योग येऊ नये, एवढीच महावितरणकडून अपेक्षा आहे.

९८५०७५३२८१

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# शांततेचे खरे मारेकरी

नुकतीच नागपूरमध्ये दंगल उसळली. दंगेखोरांनी नागपुरातील महाल परिसरामध्ये दगडफेक करणे, वाहनांना आगी लावणे, जाळपोळ करणे, घरांचे नुकसान करणे, नागरिकांना भयभीत करणे अशा पद्धतीचे काम केले. नागपूरला अशा दंगलींचा इतिहास नसल्यामुळे असे काही होईल असे खुद्द पोलिसांनाही वाटले नाही.

तसे पाहिले तर संघ स्थापनेनंतर लगेच अशा पद्धतीची दंगल नागपुरात झालेली होती. परंतु पू. डॉ. हेडगेवार यांच्या नेतृत्वात काम करणाऱ्या स्वयंसेवकांनी अतिशय जागरूक राहून दंगल करायला येणाऱ्या दंगलखोरांना चांगला चोप दिला होता. त्यावेळेस कोणीतरी डॉक्टरांना विचारले होते की, दंगल झाली तर संघाचे स्वयंसेवक काय करतील? त्यावर डॉ. हेडगेवारांनी उत्तर दिले होते की, संघाचे स्वयंसेवक पांघरूण घेऊन झोपून राहतील. प्रश्न विचारणाऱ्याला हे उत्तर थोडे खटकले. त्याने पुन्हा प्रती प्रश्न केला की तुम्ही हिंदू संघटनेचे काम करीत आहात. असे असताना हिंदू समाजावर संकट आले असता स्वयंसेवक झोपून कसे राहतील. त्यावर डॉक्टरांनी त्यांना उत्तर दिले की आपल्या वस्तीचे, आपल्या घराचे संरक्षण करणे हे प्रत्येकाचे काम आहे. त्यामुळे सर्वांनी कुठल्याही धोक्यासाठी सावध राहणे, जागृत राहणे आवश्यक आहे. तुम्ही सावध असाल, जागरूक असाल तर तुमच्या बाजूला स्वयंसेवक उभा राहील व दंगेखोरांना पळवून लावण्यात तुमची मदत करेल. परंतु तुमच्या सुरक्षेचे काम जर तुम्ही संघाच्या स्वयंसेवकांना देणार असाल व तुम्ही झोपून राहणार असाल तर असे होणार नाही.

काश्मीरमध्ये राहणाऱ्या अल्पसंख्य हिंदूंना ज्यावेळेस संघाचे लोक सांगायचे की, त्यांनी एकत्र राहिले पाहिजे, संघटित राहिले पाहिजे, त्यांच्या शेजारी मुस्लिम आहेत यामुळे त्यांच्यामध्ये कधीही धर्मांधतेचा स्फोट होऊन हिंदूंच्या जीविताला व मालमत्तेला हानी पोहोचू शकते त्यावेळेस त्यांना असे वाटायचे की संघाचे लोक विनाकारण हिंदू-मुस्लिम असा भाव निर्माण करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे कार्य करीत आहेत. परंतु इतिहास साक्षी आहे की काश्मिरातल्या हिंदूंना एक दिवस त्यांच्या मालमत्तेला सोडून अंगावरच्या राहत्या कपड्यांनिशी, आपल्या बायका, मुलांना घेऊन काश्मिरातून पळावे लागले व आजही देशाच्या विविध भागांमध्ये त्यांना राहावे लागत आहे.

कट्टरवादी आणि जिहादी मानसिकतेने या देशाचे दोन तुकडे केले. त्यातूनच पाकिस्तानची निर्मिती झाली. असे असताना देखील त्यांनी दिलेले घाव विसरून हिंदू समाज पुन्हा आपले जीवन जगायला लागला. इथे भारतात राहणारा जो सर्वसामान्य मुस्लिम समाज आहे तो छोटे-मोठे व्यवसाय करतो. त्या सर्वांचे जीवन इथे राहणाऱ्या बहुसंख्य हिंदू समाजावर अवलंबून आहे. असे असताना देखील काही धर्मांध माथेफिरू मुस्लिम युवक नागपूरमध्ये हिंसा घडविण्याचे धारिष्ट्य करतात. त्यांना वर्षानुवर्षांपासून हिंदूंच्या सोबत दुकानाला दुकान लावून, मांडीला मांडी लावून बसणारे मुस्लिम हे विरोध करू शकत नाही. त्यांना समजावू शकत नाही की नागपूरची ही परंपरा नाही. नागपूरचा हा इतिहास नाही. यावरून काय सिद्ध होते की शांतताप्रिय मुस्लिमांचे बोलणे धर्मांध आणि जिहादी कधीही खपवून घेणार नाही. त्यामुळे संबलमध्ये झालेली दंगल असो किंवा डोंबिवलीत संघाच्या शाखेवर फेकलेले दगड असो किंवा देशभरामध्ये विविध ठिकाणी याच मानसिकतेने होणारे दंगे असो यामध्ये गाव महत्त्वाचे नाही, शहर महत्त्वाचे नाही, दंगेखोरांची जिहादी मानसिकता महत्त्वाची आहे.

या मानसिकतेमुळेच आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणत आहे की आता अमेरिकेमध्ये मुस्लिमांच्या प्रवेशाला बंदी लावली पाहिजे. याच जिहादी मानसिकतेमुळे जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, इटली, युरोपच्या सर्वच देशांना त्रास होत आहे. भारताने तर आपल्या देशाचे याच मानसिकतेमुळे विभाजन सहन केलेले आहे. तीन लाख काश्मिरी हिंदूंना निर्वासित व्हावे लागलेले आहे. याच मानसिकतेमुळे देशातील अनेक भागांमध्ये पाकिस्तानसदृश परिस्थिती निर्माण झालेली आहे. हीच मानसिकता बांगलादेशी घुसखोरांना यांच्या वस्तीमध्ये पोसण्याचे काम करते. हीच मानसिकता रोहिंग्या यांना आश्रय देते. किती लिहावे आणि किती बोलावे हा प्रश्नच आहे. अशा घटनांनी हिंदू समाज काही काळापुरता जागृत होतो. त्यानंतर मात्र तो पुन्हा झोपून जातो. हिंदू समाजाची हीच झोपाळू वृत्ती संकटांना आमंत्रित करणारी ठरते. नागपूरची दंगल हेच सर्व सांगत आहे. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांनी औरंगजेबाची कबर हटवा अशा पद्धतीची मागणी केली. यात चुकीचे काय आहे. औरंगजेब हा कोणी साधू पुरुष नव्हता. तो एक आक्रमक होता. त्याने काशी विश्वनाथाचे मंदिर तोडले, त्याने कृष्ण जन्मभूमीचे मंदिर तोडले, त्याने शेकडो मंदिरांचा विध्वंस केला, हजारो लोकांना त्याने धर्मांतरित केले. त्या वेळच्या हिंदू समाजावर त्याने अनन्वित अत्याचार केले. धर्मवीर, स्वराज्य रक्षक संभाजी राजांना सुद्धा त्याने हाल हाल करून मारले. पण काही नेते त्याच्या कबरीवर जातात, फुले उधळतात. त्याच्या कबरीवर जाणारे नेते हे हिंदूंचा अपमान करण्यासाठीच त्या कबरीवर जात असतात. त्यांना याच देशामध्ये राहून तुमच्या राष्ट्रीय शत्रूंचे गुणगान करायचे आहे. त्यांचा उदो उदो करायचा आहे. त्यांच्या स्मारकाचे महिमामंडन करायचे आहे. असे करीत असताना जर काही हिंदुत्वप्रेमी प्रखर संघटनांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना असे वाटले की आम्ही लोकशाही मार्गाने निषेध केला पाहिजे तर त्यात काय चूक आहे. जर यात काही चूक असेल तर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत, त्यांच्यावर रीतसर खटला चालेल. त्यामध्ये ते आपली बाजू मांडतील. न्यायालयाला जो निर्णय द्यायचा आहे तो निर्णय न्यायालय देईल. परंतु त्यांनी आंदोलन केले म्हणून आम्ही दंगे भडकवू, दगडफेक करू, जाळपोळ करू, वर्षानुवर्षांपासून ज्या हिंदूंच्या सोबत आम्ही राहात आहोत त्यांच्या घरांना व त्यांना आम्ही क्षतिग्रस्त करू ही मानसिकता या देशामध्ये कदापि खपवून घेतली जाऊ नये. आज सर्वांना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची आठवण येत आहे. आज लोकांना बुलडोझरची आठवण येत आहे. दंगेखोरांची घरे जमीनदोस्त करण्याची कारवाई होण्याची लोक वाट पाहत आहे.

जिहादी आणि कट्टरवादी मानसिकता हीच शांततेला मारक आहे. शांततेची मारेकरी आहे. ही मानसिकता आपण कदाचित बदलू शकणार नाही परंतु आपली सज्जता आपल्या हातात असली पाहिजे. दंगा झाल्यावर आम्ही जागरूक होऊ ही गोष्ट चुकीची आहे. पोलिस पोलिसांचे काम करेल, न्यायालय न्यायालयाचे काम करेल, परंतु यामध्ये समाजाची जी हानी होऊन गेली ती भरून निघणार नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे


### सार्वजनिक जागा वापरायला देऊ नये

सोलापूर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या लोकसंख्येमुळे वाहनाचे प्रमाण व रहदारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याचे दुष्परिणाम आपण रोजच बघतो कितीतरी लोक आजपर्यंत अपघातात मरण पावले आहेत. किंवा कायमस्वरूपी दिव्यांग होऊन बसले आहेत. या सर्व गोष्टीला आळा घालण्यासाठी शहरातील महत्त्वाच्या चौकातील, रस्त्यावरील जागेवर कुठल्याच प्रकारचे अतिक्रमण अथवा जागा भाड्याने कुठल्याच कार्यक्रमाला देऊ नये. उदाहरणार्थ सात रस्त्या जवळील बीएसएनएल ऑफिस लगतची जागा नेहमीच वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी देण्यात येते या रस्त्यावर शहरातील सर्वात जास्त वाहतूक असते व येथे ट्रॅफिक पोलीस देखील कायम स्वरूपी नसते यामुळे लोकांना बऱ्याचदा त्रास होतो महानगरपालिकेला विनंती आहे की आशा सर्व जागेवर यापुढे कुठल्याच प्रकारचे अतिक्रमण अथवा कार्यक्रम होऊ देऊ नये असे वाटते.

**- फैय्याज शेख/ सोलापूर** ९४२०५४६७५१

### छत्रपती शिवरायांच्या आदरार्थी उल्लेखासाठी आडमुठेपणा का?

शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक महाराष्ट्रासह भारतात आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने या विद्यापिठाची स्थापना झाली. सध्या या विद्यापीठाच्या नामविस्तारावरून वातावरण तापले आहे. विद्यापीठाचे नामकरण 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' करण्यात यावे, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीसह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी केली आहे. १७ मार्चला या मागणीसाठी कोल्हापूर येथे भव्य मोर्चा निघाला होता. अनेक लोकप्रतिनिधींनी या नामविस्ताराला पाठिंबा दर्शवला आहे. या नामविस्ताराची विविध स्तरांवरून मागणी होत असताना विद्यापीठाच्या कार्यकारिणीने मात्र विरोध दर्शवला आहे. १५ मार्चला कार्यकारिणी आणि विद्यापीठाशी संलग्न पुरोगामी मंडळींनी विद्यापीठात झालेल्या बैठकीत 'नामांतराची मागणी करणाऱ्यांना ठोकून काढू', अशी गुंडगिरीची भाषा वापरली गेली. शिवाजी विद्यापीठाचा नामविस्तार 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' होत असेल, तर त्यामुळे महाराजांच्या नावाचा आदराने उल्लेख होईल, असा सरळसाधा सुखावणारा विचार सर्वसामान्य नागरिकांमध्ये येतो. छत्रपती शिवरायांचा उल्लेख हा आदरानेच व्हावा, असे प्रत्येक शिवप्रेमी, महाराष्ट्र आणि हिंदुत्वप्रेमींना वाटते. छत्रपती शिवरायांचा आदराने होणाऱ्या उल्लेखासाठी एवढा आडमठेपणा कशाला? हा प्रश्न साहजिकच सर्वसामान्यांना पडतो.



**संजय चौधरी**/अमरावती

### नागपुरात राष्ट्रीय विद्यापीठाचे कॅम्पस अभिनंदनीय

गुन्हेगारी तपासात अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या न्यायवैद्यकशास्त्रच्या देशभर विस्तारीकरणाच्या क्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अखत्यारित येणाऱ्या केंद्रीय गृह विभागाने देशाच्या केंद्रबिंदू असलेल्या नागपूरमध्ये राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाच्या कॅम्पसची घोषणा केली. नागपूरसोबतच रायपूर, खोरधा (ओडिशा) मध्ये सुद्धा विद्यापीठाचे कॅम्पस देण्याची घोषणा केली. गुजरातच्या गांधीनगर येथे असलेल्या राज्य न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाचे विस्तारीकरण करत त्याला राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाचे स्वरूप देण्यात आले. आता देशातील इतर भागांत विद्यापीठ परिसराची स्थापना केली जात आहे. या विद्यापीठामुळे फॉरेन्सिक सायन्स, फिंगरप्रिंट सायन्स, आर्थिक गुन्हे इत्यादींच्या अभ्यास या विद्यापीठात करता येईल. गुन्हे रोखण्यासाठी, गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सरकारला, तपास यंत्रणांना मोलाची मदत होणार आहे. राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाची स्थापना नागपुरातील कामठी मार्गावरील चिचोली येथील ५० एकर जागेवर केली जाईल. या निर्णयामुळे नागपूरच्या शैक्षणिक वैभवात भर पडून याचा लाभ फॉरेन्सिक सायन्सच्या विद्यार्थ्यांना, संशोधकांना व कर्मचाऱ्यांना होणार आहे. नागपूरमधील कॅम्पस विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रात करीअरचे नवे दार उघडेल. हे कॅम्पस नागपूरमध्ये होत असल्याचा नागपूरसह विदर्भातील प्रत्येकाला आनंद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाभिमुख नेतृत्वात भारत सर्वच ठिकाणी आणि विकासाच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. हे विद्यापीठ विकसित विदर्भाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अवैध धंद्यांना पोलिसांचेच अभय आ.अर्जुनराव खोतकरांचा आरोप

## खोतकरांनी अधिवेशनात जालन्यातील अवैध धंद्यांचा किस्साच गिरवला

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात वाढत असलेल्या अवैध धंद्यांना पोलिसांचेच अभय असुन याकडे संबंधीतांनी तात्काळ लक्ष घालुन योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे आ.अर्जुनराव खोतकर यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात सांगितले आहे.

याबाबत सविस्तर असे की, जालन्यात राजरोसपणे पोलिसांच्या आर्शिवादाने ऑनलाईन सट्टा सुरू असल्याचे आ. अर्जुनराव खोतकरांनी अधिवेशनात पुराव्यांसह माहिती देऊन शहरातील दोन सट्टा चालकांचे नावे ही जाहीर केले असुन अवैध धंद्यांचा बाजार मांडणारे मनोज टोक सह सागर चिलका यांच्यावर प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी ही यावेळी आमदार अर्जूनराव खोतकर यांनी अधिवेशनातच बोलताना केली, जालन्यात अनेक तरुणांनी या सट्टयांच्या अमिषाला बळी पडून आत्महत्या केल्याच्या देखील अनेक घटना घडल्या असल्याचे त्यांनी यावेळी नमुद केले. शहरातील सर्वसामान्य युवकांसह उद्य-ोजकांचे मुले अमिषापोटी या सट्ट्यांमुळे वाम मार्गाला लागत आहेत. जालण्याच्या पोलिस प्रशासनाला याबाबत सर्व कल्पना असुन देखील शहरातील ऑनलाईन



मटका, सट्टा अवैध वाळु वाहतुक धंदे सुरू असुन या अवैध धंद्यांना पोलिस प्रशासनाचे अभय असल्याचे त्यांनी सांगितले. जालन्यातील खालच्या स्तरा-वरील पोलिस प्रशासण या अवैधधंदे चालक मनोज टोक सह सागर चिलका यांच्या कडुण मोठ्या प्रमाणावर हप्तापोटी आर्थिक रक्कम घेत असल्याचा देखील आरोप त्यांनी यावेळी केला. यामुळे जालन्यात मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे खेळवणाऱ्यांनी डोके वर काढले आहे . यांना पोलिस प्रशासना ने पकडुण गुन्हे दाखल करावेत अशी मागणी अधिवेशनात अर्जुनराव खोतकरांनी केली.

# मतिमंद महिलेवर बलात्कार

## भोकरदन पोलीस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

शेतात कड्या आणण्यासाठी गेलेल्या मतिमंद महिलेवर तिघांनी आळीपाळीने बलात्कार बलात्कार केल्याची घटना घडली आहे. कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. आठ दिवसानंतर या पुतण्याने काकाला सांगितल्यानंतर घटना गुरुवारी (दि.२०) ही उघडकीस आली आहे.

या प्रकारणी मतिमंद महिलेच्या पतीने दिलेल्या फिर्यादीवरुन सद्दामखॉ अजमेरखॉ पठाण, सादीकखॉ शरीफखॉ पठाण, फारुखखॉ जिलाणीखॉ पठाण (सर्व रा.कठोराबाजार ता.भोकरदन) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, एक वर्षापूर्वी माझी लग्न झाले असून माझी पत्नी मतीमंद आहे. शेजारी गावात शेत जमीन असून अपंग असुन माझी उपजीविका पूर्ण शेतीवरच आहे. दरम्यान गुरुवारी (दि.१३) दुपारी १ वाजेदरम्यान दोघांनी जेवन केले. त्यानंतर पत्नीही शेतात जळत आणण्यासाठी गेली आणि मात्र सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास परत आली. पतीनी घरात आल्यानंतर रडत होती, पण ती मतीमंद असल्याने ती मला काही एक सागत नव्हती. मी तिला वारंवार काय झाले असे विचारत होतो. मात्र तिला काही सांगता येत नव्हते. दरम्यान गुरुवारी (दि.२०) रात्री १० वाजेदरम्यानमाझा पुतण्या घरी आला त्यांने सांगितले की, गुरुवारी (दि.१३) दुपारी २ ते ३ वाजेदरम्यान मी शेतात काम करत असतांना मला तुमच्या शेतात ओरडण्याचा आवाज आल्याने मी शेतात जावुन पाहीले असता तुमच्या शेताजवळ असलेल्या नाल्याजवळ काकुला आपल्या गावातील सद्दामखॉ अजमेरखॉ पठाण, सादीकखॉ शरीफखॉ पठाण, फारुखखॉ जिलाणीखॉ पठाण यांनी त्यांचे कपडे काढुन तिघे त्याचा बलत्कार करतांना मी लांबून पाहीले. तेव्हा माझ्या मोबाईलचा कॅमेरामध्ये व्हीडीओ चालु करुन जवळ गेलो असता दोघे मला पाहुन पळून गेले. यातील फारुख फारुखा त्यांचा छळ करत होता. आरडाओरडा केल्यानंतर काकूची सुटका झाली. यानंतर काकूला घरी घेऊन येत असताना सद्दामखॉ अजमेरखॉ पठाण याने अडवून मोबाईल फोडला. त्याने धमकी दिली की, तु जर आम्ही काय केले आहे हे कोणाला सांगीतले तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन तेथुन निघुन गेला. परंतु त्यापूर्वी माझ्या मोबाईलमध्ये काढलेला व्हिडीओ माझ्या मित्राच्या व्हॉटसअप वर पाठवला होता. त्यानंतर काकूंना गाव-ाजवळ सोडुन निघुन गेलो असे त्यांने सांगीतले. याबाबत झालेल्या घटनेची माहिती गुरुवारी काकाला दिल्यानंतर काकांनी भोकरदन पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## संक्षिप्त

### संतांच्या नामचिंतनामध्ये मोक्ष प्राप्तीची ताकत- ह.भ.प.विष्णू महाराज सास्ते



**तभा वृत्तसेवा**
**आव्हाना/प्रतिनिधी**

मोजै श्री गणेश वाडी आव्हाना येथे चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताह शिवमपुराणकथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा या सातव्या वर्षाच्या उत्साहामध्ये पहिल्या दिवसाचे कीर्तन सेवा सास्ते महाराज यांची संपन्न झाली त्यामध्ये शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांचा षष्ठीच्यापर्वकाळ असल्याकारणाने धन्य धन्य एकनाथा तुमचे पायी माझा माथा या अभंगावरती गोड निरूपण महाराजांनी केलं त्या मध्ये संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या दर्शनामध्ये दासोपंतांचा अभिमान गेला संत श्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्या दरबारात प्रत्यक्ष दत्तप्रभूंनी चोपदारकिच काम केलं यौवन अंगावर थुंकला व त्याला प्रसाद देऊन त्याचे जीवनात मुक्तता प्राप्त करून दिली आणि म्हणून निळोबाराय म्हणतात माता ठेवण्यासाठी माझ्या जीवनामध्ये जर कोण असेल तर ते म्हणजे संतश्रेष्ठ एकनाथ महाराज आहे असं गोड निरूपण सास्ते महाराजांनी केलं प्रथमच दिवशी बाल वारकरी तरुण मंडळी माता भगिनी अन्नदान आणि सत्संग याचा फार मोठा आयोजन श्री गणेश वाडीतील मंडळींनी केलेला आहे खरंतर प्रत्येक ठिकाणी भगवंताचा नाम चिंतन संतांच नामचिंतन हे झालं पाहिजे छत्रपती शिवाजी महाराज धर्मवीर संभाजी महाराज महाराणा प्रताप अनेक महात्म्यांनी आणि अनेक हुतात्म्यानी तुमच्या आमच्या जीवनामध्ये फार मोठी शिकवण दिलेली आहे आणि ती चांगली ग्रहन करून ती जीवनामध्ये अंगीकृत करून प्रत्येकाने जीवन जगावं आणि त्यासाठी आशा उत्सवाची गरज आहे असे सास्ते महाराजांनी निरोपण केलं शिवमहापुराण कथेचा आनंद सर्वांनी घ्यावा त्यामध्ये बुद्धिमत्तां वरिष्ठ असणारे गणपती बाप्पा यांनी प्रत्येकाच्या जीवनामध्ये आई-वडील किती श्रेष्ठ आहे यासाठी गोड उदाहरण या ठिकाणी महाराजांनी दिलं की कार्तिक स्वामी आणि गणपती बाप्पा यांना शिवपार्वतीने पृथ्वीच्या सात प्रदक्षणा करायचा सांगितलं पण आई वडील किती महत्त्वाचे याचे ज्योतक गणपती बाप्पांनी प्रत्येकासमोर ठेवलं म्हणजे गणपती बाप्पांनी सर्वश्रेष्ठ तीर्थक्षेत्र म्हणून आपले आई-वडिलांच्या साथ प्रदक्षिणा केल्या आणि आपल्या जीवनामध्ये जो लाभ पाहिजे तो लाभ प्राप्त करून घेतला म्हणून सकळतीर्थाचे धुरे जे का माता पितरे तया सेवीसी किर शरीरे लोन कीजि म्हणून सर्वश्रेष्ठ आई-वडील आहे याच गोड चिंतन सास्ते महाराजांनी केलं उपस्थित गजानन महाराज पांचाळ हिंगोली कर गव्हाड सर प्रकाश महाराज दिलीप महाराज खेडकर सर भास्कर महाराज ठाले चोपदार व गावातील भजनी मंडळ पत्रकार बांधव सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोनाली चंदेल ची नवोदय साठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

येथील यशराज कोचिंग क्लासेसची विद्यार्थिनी कुमारी सोनाली दारासिंग चंदेल हिची नवोदय विद्यालय अंबा ता.परतूर येथे जानेवारी २०२४ मध्ये घेन्यात आलेल्या प्रवेश परीक्षेमधून इ ६ वी साठी प्रतीक्षा यादी मधून निवड झाली.

ज्ञानार्जन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था तळणी संचलित यशराज कोचिंग क्लासेसची परंपरा २०२४/२५ साठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांनी कायम ठेवली. जानेवारी २०२४ मध्ये झालेल्या प्रवेश परीक्षेचा निकाल ३१ मार्च २०२४ रोजी लागला. त्यामध्ये क्लासेसची एक विद्यार्थिनी पात्र झाली होती. आता मार्च २०२५ मध्ये २०२४ च्या प्रतीक्षा यादी मधील विद्यार्थिनी कुमारी सोनाली चंदेल हिची निवड करण्यात आली आहे. सोनाली चंदेल ही तळणी गावचे उपसरपंच श्री विश्वनाथ सिंग चंदेल यांची नात असून अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेची आहे. सोनालीची मोठी बहीण सोनल चंदेल हीची निवड सुद्धा नवोदय विद्यालय आंबा येथे झाली होती.तिने नुकतीच १० ची परीक्षा दिली.दोन्ही ही बहिणी यशराज कोचिंग क्लासेसच्याच विद्यार्थिनी आहेत. या निवडी बद्दल क्लासेसच्या संचालिका व संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता बायस, सोनालीचे गुरु व संस्थेचे सचिव श्री. अभिमान बायस, कोषाध्यक्ष सौ. वंदना चंदेल, सरपंच श्री. गौतम सदावर्ते, उपसरपंच श्री.विश्वनाथसिंग चंदेल यांनी सोनालीचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# स्नेह मिलनातून मैत्रीची नाते घट्ट होते -आ.राजेश राठोड



**तभा वृत्तसंस्था**
**मंठा/प्रतिनिधी**

स्नेह मिलनातून मैत्रीची नाते घट्ट होते आमदार राजेश राठोड माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा उत्साहात.२३ वर्षानंतर मिळाला जुन्या आठवणींना उजळा याविषयी सविस्तर वृत्त अशी की सध्याच्या धकाधकीच्या जीवनात माणसाची आयुष्य एवढी व्यस्त झाले आहे की मित्रांना भेटण्यास वेळ मिळत नाही मात्र रेणुका विद्यालयातील सन २००३-२००४ या कालावधीतील माजी विद्यार्थ्यांनी आज (ता.२३) रविवार रोजी एकत्रित येऊन शहरातील जालना रोडवरील माऊली मंगल कार्यालयात स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राजेश राठोड माझी प्राचार्य के पी इंगळे मुख्याध्यापक सचिन राठोड उपप्राचार्य आर के राठोड उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून दीपप्रज्वल करून करण्यात आले.

या स्नेह मिलन मेळाव्याला मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच सन.२००३-२००४ या काळातील रेणुका विद्यालयातील शिक्षकांनी हजेरी लावली. या स्नेह मिलनाला संबोधित करताना आमदार राजेश राठोड पुढे म्हणाले की सर्व माझी विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन दरवर्षी स्नेह मेळावा घेतला पाहिजेत जेणेकरून मैत्रीची नाते घट्ट होते. या स्नेह मिलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संगीत खुर्ची व विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन मनसोक्त आनंद लुटला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत दळवी यांनी केले तर प्रास्ताविक भूषण राठोड यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश भावसार यांनी केली या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी विद्यार्थिनी अभिजीत दळवी भूषण राठोड नरेश राठोड प्रवीण वायाळ उमेश भावसार श्रीपाद जोशी दीपक बन विलास सराफ शितल रामपूरकर वर्षा वाघ आरती मणियार प्रियंका मणियार शीतल झवर विद्या कुलकर्णी अर्चना कुलकर्णी ,शितल रामपूरकर,रेश्मा पैठणकर ,दीपक बन,आदींची उपस्थिती होती.

# किरकोळ वादातुन एकास मारहाण, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील दिनांक २२.०३.२०२५ रोजी मागचा किरकोळ वादाच्या राग मनात ठेवून एका इसमावर भरदिवसा पिस्तूलच्या साहाय्याने जखमी करण्याची घटना मंठा तालुक्यातील मंठा लोणार रोड येथे आहेरे पेट्रोल पंप येथे घडली आहे.


सूत्रांकडून मिळालेली माहिती अनुसार दुपारी बारा वाजेच्या सुमारास मंठा ते लोणार रोड वरिल आहेरे पेट्रोलपंप येथे विकास बंडु चव्हाण वय २२ वर्ष रा ढोकसाळ हे पैशाची गरज असल्याने पेट्रोल पंम्पावर पैसे काढण्यासाठी गेलो असता तेथे अविनाश लक्ष्मण चव्हाण व युवराज उघडे दोन्ही रा. पिंपरखेडा खराबे या दोन आरोपी विकास चव्हाण ला तिथे पाहताच म्हणाले हा त्या दिवशीचा आपल्या सोबत ढोकसाळ शाळेसमोर भांडन करणारा हा मादरचो.. आहे. असे पाहताच विकास चव्हाणने विचारले तुम्ही मला शिवीगाळ का करता? असे म्हण-ताच अविनाश चव्हाण याने पुन्हा शिवीगाळ करुन मला चापटा बुक्याने भरघोस माराहाण केली त्यावेळी अविनाश चव्हाण याच्या हातामध्ये बंदुक होती तीची मुठ विकासच्या डोक्यात मारुन त्याला जखमी केले आणि म्हणाले हा लय मस्तीला आला यास पकड असे युवराज यास म्हणाला असता युवराज याने त्याचे खीशातील फायटर काढुन पुन्हा विकासच्या डोक्यात मारुन दुखापत केली आणि म्हणाला तु जर परत आमच्या नादी लागला तर तुला व तुझ्या कुटुबालासहित जिवंत मारुन टाकण्याची धमकी विकास चव्हाणला दिली आहे. याघटनेचा मंठा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कैलास भरती हे करत आहे.

# आजार ग्रस्त लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजना मंजूर

## आ.बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांचे विशेष प्रयत्न परतुरच्या तहसीलदार प्रतिभा गोरे यांची उत्तम कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील दुर्धर आजार ग्रस्त यांचे संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे प्रस्ताव तयार करून. पद्माकर कवडे पाटील व एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र ग्रामीण रुग्णालय परतूर, समुपदेशक शिवहरी डोळे. यांच्या पुढाकाराने तालुक्यामध्ये जवळपास ५५ लाभार्थ्यांचे प्रस्ताव तयार केले. संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर पेन्शन टाकण्यासाठी. आज रोजी सर्व लाभार्थ्यांचे बँक



अकाउंट व आधार लिंक असलेली आधार कार्ड. सर्व संचिका तयार करून. तहसीलदार यांना तहसील कार्यालयात दाखल करण्यात आल्या आहेत.

# महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी वानखेडे, कार्याध्यक्ष रत्नपारखे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महात्मा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त यावर्षी ११ एप्रिल २०२५ रोजी ११ हजार १९८ बुंदीचे लाडुचे वाटप जालना शहरात करण्यात येणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्सव समिती २०२५ च्या अध्यक्षपदी बाबासाहेब शिवाजी वानखेडे यांची तर कार्याध्यक्षपदी सुरेश रत्नपारखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जालना शहरातील सावता मंगल कार्यालयात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. यावेळी आश्विन अंबेकर, संतोष जमधडे, शिवकुमार राऊत, विष्णु पाचफुले, गणेश तरासे, लक्ष्मण इधाटे, शंकर तारो, सचिन वानखेडे, शंकर घोडके, काळुराम घोडके, मुन्ना भोसले, भाऊसाहेब घुगे, मंगला खांडेभराड, राजेंद्र जाधव, सुरेश रत्नप-ारखे, शिवकुमार राऊत, सुयोग खर्डेकर, , कडुबा वाकीकर, वैजीनाथ नागरे, गोकुळ स्वामी, ॲड. हर्षद बागवान, दलितमित्र बाबुराव मामा सतकर, नंदकिशोर जांगडे, दत्ता खांडेभराड, ॲड. रामेश्वर खांडेभराड, अनिल वाघमारे, नितीन तायडे, रामचंद्र फुलझाडे, बबन खरात, बाळु देशमुख यांची उपस्थिती होती. उपाध्यक्षपदी डॉ. श्रावण शेवाळे, दिपक वैद्य, नितीन इंगळे, गणेश तरासे, संदीप मगर, अमोल धानुरे, डॉ. विशाल धानुरे, शिवकुमार राऊत, सहसचिव बाबासाहेब सोनुने, सदस्य नितीन तायडे, बाबासाहेब वानखेडे, गंगुबाई वानखेडे, गोकुळ स्वामी, राजेंद्र जाधव, विजय पवार, सुरेशकुमार रत्नपारखे, मंगला खांडेभराड, गंगुबाई वानखेडे ,सय्यद सलमान आदिंची निवड करण्यात आली.

# झाडांच्या झालेल्या कत्तलीमुळेच, पर्जन्यमानात घट, लोणीकरांचा हफ्तेखोर फॉरेस्ट अधिकाऱ्यांवर घणाघात

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतुर येथील शेख खालिक शेख अब्दुल्ला यांच्या मालकीच्या लोकसेवा सॉ मिल वर फॉरेस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केलेली असून, त्यांच्याकडे कडुलिंब वड उंबर पिंपळ आदी प्रजातीच्या लाकडांचा अवैध साठा आढळून आल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली असल्याचे समजते या संदर्भातील अधिक वृत्त असे की माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत फॉरेस्ट विभाग व सामाजिक वनीकरण ची लक्तरे वेशीवर टांगताना सांगितले की, फॉरेस्ट विभागातील व सामाजिक वनीकरण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे जिल्ह्यातील वनक्षेत्र घटलेले असून त्यामुळे जिल्ह्याची वाळवंट झाला असल्याचा आरोप करताना वड पिंपळ कडूनिंब आपटा यासह ५१ जातीच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचा आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला.

पुढे बोलताना ते म्हणाले की,



मिल मालक स्वतःची ट्रक ट्रॅक्टर पाठवून गावागावातील विविध प्रकारच्या झाडांची तोड करतात त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होण्याबरोबरच जालना जिल्ह्यात पर्जन्यमान घटलेले आहे याचा थेट परिणाम शेतकऱ्यांवर होत असून, पावसाचे प्रमाण अत्यल्प झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते यातून घरातील किडूक मिडूक विकून पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते त्यामुळे फॉरेस्ट विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात वनमंत्री कारवाई करतील काय असा सवाल माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला

राणी वाहेगाव , सुरूगाव, मंठा या सह १२ ठिकाणी सामाजिक वनीकरण च्या वतीने अटल घनवन विकसित करण्यात आले होते यासाठी प्रत्येकी ३० लाख रुपयांचा खर्चही शासनाने केला होता मात्र यापैकी, राणी वाहेगाव येथील अटल घन वनातील ३० हजार वृक्षांची कत्तल करून ती वृक्ष तोडून टाकण्यात आल्याने सामाजिक वनीकरण चे अधिकारी झोपा घेतात काय असा सवाल आमदार लोणीकर यांनी विधानभवनामध्ये उपस्थित केला. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, दरवर्षी रस्त्याच्या दुतर्फा सामाजिक वनीकरण विभाग झाडांची लागवड करत असतो त्यावर सरकार मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करते मात्र तात्पुरते झाडे लावून जवळपास त्याच्या नावाखाली खोटा खर्च उचलत सामाजिक वनीकरण चे तालुका जिल्हा स्तरावरील अधिकारी आपली उखळ पांढरे करतात त्यामुळे वृक्ष लागवडीचा फायदा होत नसल्याचे आमदार लोणीकर यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले याबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी विधान भावनांमध्ये प्रश्न उपस्थित केल्यानंतर फॉरेस्ट विभागा ला खडबडून जाग आली असून परतूर तालुक्यातील लोकसेवा मिलवर त्यांनी कारवाई केली असून मंठा तालुक्यात काही अवैध वृक्षतोड करून आणणारी ट्रॅक्टर पकडले आहेत मात्र अशा प्रकारच्या जुजबी कारवाया करणाऱ्या अधिकाऱ्यांना वनमंत्र्यांनी कारवाई करून पदच्युत करावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे वृक्ष अधिनियम १९६४नुसार वन गुन्हा क्रमांकीं - ०२/२०२५ अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला असून, अवैधरित्या महाराष्ट्र वन अधिनियम डावलत विविध प्रकारच्या निसर्गातील महत्त्वाच्या अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून अशा प्रकारचा काळा धंदा करणाऱ्या शेख खालीक यांच्या लोकसेवा मिलवर दिनांक २१ रोजी वनसंरक्षक छत्रपती संभाजीनगर येथील श्री प्रमोद चंद लाकरा उपवनसंरक्षक श्रीमती सुवर्णा माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक श्री एन एस मुंडे व वनपरिक्षेत्र अधिकारी पीएम दौंड यांच्या नेतृत्वात वनपाल विकास अवचार कु आर बी बनसोडे के बी वाकोदकर एम एम डब्ल्यू सय्यद बीजी पवार वनरक्षक वन मजूर श्री आत्माराम राठोड यांनी ही कारवाई केली असून लोकसेवा मिल च्या माध्यमातून अवैध वृक्षांची कत्तल करणे निसर्गाला हानी पोहोच-वणे अशा प्रकारचे गोरख धंदे केले जात असल्यामुळे ही कारवाई झाली असल्याचे फॉरेस्ट विभगा कडून समजते

# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त टीबी मुक्त ग्रामपंचायतींचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

आरोग्य विभागाच्यावतीने जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला. यावेळी जागतिक दुरीकरण कार्यक्रमांतर्गत टीबीमुक्त ग्रामपंचायतींचा सत्कार मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अप्पर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, अति जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग फोफसे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ कत्रुवार, डॉ बालाजी भाकरे, आयएमएचे सचिव डॉ राम मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत पोर्टेबल एक्सरे मशीनचे लोकार्पण देखील करण्यात आले. यावेळी बोलतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी टीबीमुक्त ग्रामपंचायतीचे कौतुक करीत यावर्षीही सातत्य ठेवण्याचे आवाहन केले. जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ तडस यांनी टीबीमुक्त ग्रामपंचायत अधिक प्रभावी करण्यासाठी गाव पातळीवर प्रशिक्षणाची गरज असल्याचे नमुद केले तर अधिष्ठाता मुंगल यांनी क्षयरोग निर्मुलन करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना एकत्र घेऊन प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात जिल्हा क्षयरोग अधिकारी देवेंद्र जायभाये यांनी हिंगोली जिल्हा टीबीमुक्त करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करण्यात आले. यावेळी आशा वर्कर, आरोग्य कर्मचारी, आरोग्य संस्था यांनी सहकार्य केले. येत्या तीन वर्षात क्षयरूग्ण शोधून तपासणी करावी व टीबी आजाराचे तत्काळ निदान करावे त्यासाठी जिल्हा क्षयरोग केंद्रामार्फत थुंकी तपासणी तसेच एक्सरे तपासणी केली जाते. याचा जास्तीत जास्त नागरिकांना फायदा होईल त्यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

यावेळी रौप्य पदक प्राप्त औंढा तालुका ६, वसमत तालुका ९, हिंगोली तालुका ४, कळमनुरी तालुका ५, सेनगाव तालुका १० अशा एकूण ३४ ग्रामपंचातींचा रौप्यपदक व प्रमाणपत्र देऊन गौरव सरपंच, आशा, आरोग्य कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणारी आरोग्य संस्था म्हणून हिंगोली तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आखाडा बाळापूरचे वैद्यकीय अधिकारी डॉ राजेश कत्रुवार यांना प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी उत्कृष्ट काम करणारे समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालाजी उबाळे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय परिचर्या महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी, जिल्हा क्षयरोग केंद्राचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली– महिला बचत गटाच्या विक्री प्रदर्शनीला सुप्रसिध्द कंत्राटदार रामचंद्र कयाल यांनी भेट देऊन उत्पादीत वस्तुंची खरेदी केली. यावेळी शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के आदी. छाया– सुनील पाठक**

# जागतिक जल दिनानिमित्त जनजागृती साठी नियोजन– नेहा भोसले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

जागतिक जल दिनानिमित्त जिल्ह्यात तालुका व ग्रामपंचायतीमध्ये पाण्याचे महत्व, वापर, हातळणे याबाबत जनजागृती व्हावी याकरिता शालेय विद्यार्थ्यांची स्वच्छता फेरी, गावकरी सहभागी स्वच्छता दिंडी, पिण्याच्या पाण्याचा परिसर स्वच्छता करणे, स्त्रोतांची क्लोरीनेशन प्रात्यक्षिक करणे आदी उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांनी सांगितले.

शनिवारी (दि. २२) जागतिक जल दिनानिमित्त पाण्याचा काटकसरीने वापर करणे, जलसंवर्धन, पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच पिण्याच्या पाण्याची जागा, पाणीपुरवठा करणारी यंत्रणा यांची साफसफाई करणे, तसेच शाळा अंगणवाडी परिसर स्वच्छता करणे, पाऊस पाणी संकलनासाठी नियोजन करणे, पाण्याचा साठा वाढविण्यासाठी गाव परिसरात पावसाचे वाहते पाणी आढळून जमिनीत मुरवणे गरजेचे आहे. याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करून जल प्रतिज्ञा घेण्यात येत आहे. गावामध्ये भविष्यात पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध राहील. तसेच गावातील प्रत्येक घरामध्ये नळाद्वारे प्रती व्यक्ती ५५ लिटर पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल. यासाठी ग्रामस्थांबरोबर नियोजन करावे, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) संजय कुलकर्णी यांनी केले आहे.

जागतिक जल दिनाच्या निमित्ताने ग्रामस्तरावर १०० टक्के गाव नळ जोडणी पूर्ण होऊन 'हर घर जल' ग्रामपंचायत घोषित करण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत बैठक घेऊन मार्गदर्शन करावे. पाणी गुणवत्ता या मोहिमेअंतर्गत स्वच्छता सर्वेक्षणबाबत तपासणी मोहीम राबवविणे, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत येथील टाक्या साफ करून घेणे. नळ जोडणी असल्याची खात्री करणे, ग्रामपंचायत स्तरावर पाणी व स्वच्छता समिती समवेत लोक वर्गणी व पाणीपट्टी गोळा करणे, वैयक्तिक नळ जोडणी नोंदीबाबत गावस्तरावर आधार कार्ड गोळा करून ऑनलाईन नोंदी करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिले.

# थकबाकी असणाऱ्या गाळ्यांना न.प. ने ठोकले सील

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

पाच वर्षापासून दुकान भाडे कर थकल्याने नगर परिषद वसुली पथकाकडून हिंगोली शहरातील कोथळज रोड येथील शॉपिंग सेंटर मधील २ दुकाने सील करत कारवाई केली आहे. नगर परिषद कार्यालयाने चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता व पाणीपट्टीचे १००% वसुलीचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या आदेशानुसार विशेष वसुली पथक तयार करण्यात आले असून



सदरील पथकाकडून मालमत्ता सील करणे व नळ जोडणी खंडित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

नगर परिषद कर विभागाकडून थकबाकीदारांना मागणी नोटीस देऊन तसेच वारंवार तगादा लाऊन सुद्धा थकबाकीदारा कडून प्रतिसाद मिळत नसल्याने नगर परिषद वसुली पथकाकडून सदरील दुकानांना सील करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. मालमत्ता जप्ती व नळ जोडणी खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार असल्यामुळे हिंगोली शहरातील सर्व थकबाकीदार यांनी तात्काळ मालमत्ता कर व पाणीपट्टी भरणा करून कटू कारवाई टाळावी व नगर परिषद प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी केले आहे.



**हिंगोली– महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंचे जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाला सध्या उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून या विक्री प्रदर्शनात नागरिक विविध वस्तू खरेदी करण्यासाठी येत आहेत. यावेळी प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचारी यांनी बचत गटांकडून उत्पादीत वस्तुंची खरेदी केली. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### बसस्थानक परिसरात पाणपोईचे उद्घाटन



हिंगोली– परमपूज्य स्वामी पूर्णानंद सरस्वती यांच्या आशीर्वादाने हिंगोली बस स्थानक येथे पाणपोईचे उद्घाटन माजी आ. गजाननराव घुगे व ज्येष्ठ गुरुबंधू गोवर्धन सारस्वत यांच्या हस्ते करण्यात आले. उन्हाळ्यामध्ये बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी येथील सर्व गुरुबंधू परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या वेळी बाळू कानबाळे, शैलेश भंडारी, विजय सराफ, विशाल वर्मा, डॉ. श्रीधर कंदी, हनुमान मुंदडा, महेश दायमा, संतोष डहाळे व सर्व गुरुपरिवार उपस्थित होता.

### शहीद दिनानिमित्त भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना ठिकठिकाणी अभिवादन



हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शहीद दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार डी. एस. जोशी, मनकर्णा जाधव, कुसुम भिसे, रमेशचंद्र मुकाडे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शहरातील शहीद भगतसिंग मार्ग रामलीला मैदान येथे शहीद दिनानिमित्त भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सुखबीरसिंग अलग, रघुवीसिंग सेठी, गगनदीप सिंग अलग, प्रवीण पवार आदींची उपस्थिती होती.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असलेल्या महान क्रांतीकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना दि २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. यानिमित्त देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील शहीदांच्या प्रतिमेस येथील गांधी चौकात नागरिकांच्यावतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाम खंडेलवाल पहेलवान, गणेश साहू, गौरव कालवाडीया, किशोर अग्रवाल, विजय अग्रवाल, गोपाल शर्मा, सतीश लोलगे, संतोष खर्जुले, उमेश शर्मा, मोहन लोंढे आदींची उपस्थिती होती.

# शिक्षक पात्रता परिक्षेचा निकाल राखीव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेतील ७८६ उमेदवारांचा निकाल काही कारणास्तव राखीव ठेवण्यात आला असून, ही परीक्षा दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी झाली आहे.

या प्रकरणी सुनावणीसाठी संबंधित उमेदवारांना दि. २५ मार्च ते ४ एप्रिल २०२५ पर्यंत सकाळी ११ वाजता उमेदवारनिहाय दिलेल्या नियोजनाप्रमाणे आपले म्हणणे मांडण्यासाठी प्रस्तुत कार्यालयात उपस्थित राहण्याबाबतचे पत्र संबंधित उमेदवारांच्या ई–मेल, एस.एम.एस. व परीक्षार्थ्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी कळविण्यात आलेल्या दिवशी सकाळी ११ वाजता स्वखर्चाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या ठिकाणी वेळेत उपस्थित रहावे. या दिवशी उमेदवार समक्ष हजर न राहिल्यास त्यांचे या प्रकरणी काही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरून त्याबाबत उपलब्ध पुराव्याच्या आधारे निर्णय घेण्यात येईल व तो निर्णय बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. सुनावणीच्या वेळी आधारकार्ड, शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ मधील उत्तरपत्रिकेची कार्बन कॉपी, परीक्षेचे प्रवेशपत्र, पुराव्यासाठी परीक्षेच्या संदर्भातील आवश्यक असलेले अनुषंगीक सर्व कागदपत्रे, संदर्भात गुणपत्रक प्रमाणपत्र तसेच फोटो आळखपत्र (चालक परवाना/बँक पासबूक/निवडणूक ओळखपत्र पासपोर्ट यापैकी कोणतेही एक) यासह स्वतः उपस्थित राहावे. सुनावणीच्या वेळी अन्य कोणालाही उपस्थित राहता येणार नाही याची नोंद घ्यावी, असे आवाहन आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ४ कोटी ३७ लाखांची १४४ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**



येथील तालुका विधी सेवा समिती, सर्वोच्च न्यायालय तसेच मुंबई उच्च न्यायालय व परभणी जिल्हा न्यायालय तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली न्यायालयात दि.२२ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकन्यायालयामध्ये प्रलंबित असलेली ४२९ प्रकरणे तसेच विद्युत महावितरण कंपनी व विविध बँका यांची वाद दाखलपूर्व ३ हजार ३३० प्रकरणे तडजोडीसाठी लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी १४४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तडजोडी आधारे प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणात तब्बल ४ कोटी ३७ लाख ९२ हजार ७०८ रुपयांची प्रकरणे निकाली काढण्यात आली.

या लोकन्यायालयासाठी हिंगोली येथे न्यायिक अधिकारी तसेच विधीज्ञ समाविष्ट असलेले पाच पॅनल तयार करण्यात आले होते.

या लोकअदालतीमध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी.एस.अकाली यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधीश–१ आर. व्ही. लोखंडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ पी. जी. देशमुख, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती व्ही. व्ही. सावरकर, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी. यु. राजपूत, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आय. जे. ठाकरे यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम केले. ही लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा न्यायाधीश–२ श्रीमती एस.ए.माने–गाडेकर, मुख्य न्याय दंडाधिकारी श्रीमती ए. बी. कुरणे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जी. के. नंदनवार, तिसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती पी. आर. पमनानी यांनी प्रयत्न केले. या लोकअदालतीला वकील संघाचे अध्यक्ष ॲड एस. आर. भुक्तर, उपाध्यक्ष ॲड. ए. पी. बांगर, सचिव ॲड. अखील अहेमद, वकील संघाचे सर्व सभासद, न्यायालयीन व पोलीस कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# औंढ्यात स्वामी समर्थांचा पालखी सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

श्री स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्र औंढा आयोजित श्री स्वामी समर्थ महाराज जयंती निमित्ताने पालखी सोहळ्याचे २३ मार्च रविवारी आयोजन करण्यात आले होते. या श्री स्वामी समर्थ यांच्या पालखीचे कळमनुरी विधानसभा शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी पूजा करून व दर्शन घेतले. त्यानंतर पालखी सोहळ्यास सुरुवात झाली. औंढा नागनाथ शहरातील श्री स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्रापासून कासारगल्ली, जोशी गल्ली, पाटील गल्ली, छत्रपती शिवाजी नगर, जुने बस स्थानक, मुख्य बाजारपेठ, डॉ हेडगेवार चौक, सोनार गल्ली, शिवाजी चौक, लवंडेश्वर मंदिर, भोई गल्ली मार्गे श्री स्वामी समर्थ साप्ताहिक सेवा केंद्र पर्यंत पालखी सोहळा काढण्यात आला. त्या मार्गावर रांगोळी काढण्यात आल्या होत्या. पताकाधारी व टाळ मृदंगाच्या गजरात पालखी सोहळा निघाला. या पालखीत युवा जिल्हाप्रमुख राम कदम, पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, सविता चौंढेकर, अश्विनी पाटील कुंताबाई गोबाडे, अनिल देशमुख, अलका कुरवाडे, शीतल चौंढेकर, नागनाथ महाटे, मेघा गोबाडे, सतीश चौंढेकर, लल्ला देव, विक्की झांझरी, संतोष गोबाडे, माधव गोरे, धुरपत गोरे यांच्यासह स्वामी समर्थ सेवेकरी व भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी होते.

# सावरखेडा गाव 'हर घर जल' घोषित



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २४ मार्च**

तालुक्यातील सावरखेडा या गावात जलजीवन मिशन अंतर्गत काम पूर्ण करून घरोघरी नळ बसवून ग्रामस्थांना पाणीपुरवठा सुरू झाला आहे त्यानंतर दि. २४ मार्च सोमवार रोजी सकाळी साडेअकरा वाजता गावात ग्रामीण पाणीपुरवठाचे उपविभागीय अभियंता आर एस नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभा घेऊन ग्रामसभेत हर घर जल म्हणून सदरील गाव घोषित करण्यात आले आहे.

यावेळी ग्रामीण पाणी पुरवठा कनिष्ठ अभियंता आर ए बोरकर, सरपंच मुक्ताबाई हाके, उपसरपंच मालताबाई काचगुंडे, ग्रामविकास अधिकारी बळीराम खोकले, अभियंता बीएल रिठे, सदस्य सीमा कवडे, जनाबाई सावंत, पांडुरंग हाके, मीरा सावंत, तसेच स्वप्निल कंट्रक्शनचे प्रल्हाद चव्हाण, प्रकाश चव्हाण, बाळासाहेब चव्हाण संजय थोरात दादाराव हाके, ज्ञानेश्वर हाके, रखमाजी सावंत विकास काचगुंडे, रामकिसन रुपनर, अंबादास कवडे, प्रकाश ढाले, अंगणवाडी ताई सिंधुबाई रुपनर, आशा वर्कर साधना रुपनर, दिपाली कवडे, ग्रामपंचायत सेवक अशोक काळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. गावात नळाला हर घर जल आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# नांदेड मध्ये आज महाविहार बुद्धगया मुक्ती आंदोलन महामोर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च**

बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले बिहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी उद्या २५ मार्च रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय- सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केलेले आहे.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली वर्षांनवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापनावर ताबा घेऊन



मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल क्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. त्यामुळे सदर कायदा तत्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी भारतभर बौद्ध भिक्खू आणि अनुयायींनी व्यापक आंदोलन छेडले आहे.

बुद्धविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदेड जिल्ह्यात मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. नांदेडच्या कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान नवीन मोंढा नांदेड येथे दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायींचा जमाव जमणार आहे. नवा मोंढा मैदान येथून महामोर्चाची सुरुवात होणार असून नियोजित भगवान बुद्ध पुतळा, महात्मा फुले पुतळा, शिवाजीनगर, कलामंदिर, वजीराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय असा महामोर्चाचा मार्ग राहणार आहे. महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पोहोचल्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे, अशी माहिती महामोर्चा संयोजन समितीच्या वतीने संयुक्त प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

# अवैध मार्गाने वाळुची वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडले

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २४ मार्च**

इस्लापूर परिसरातील रिठ्ठा येथे विनापरवाना वाळू ची वाहतूक करतांना दोन ट्रॅक्टर पोलीसांनी पकडले.हि कारवाई दि. २२ च्या रात्री साडेआठ वाजताच्या दरम्यान करण्यात आली. दरम्यान इस्लापूर पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे पंचक्रोशीत मोठे कौतुक केले जात आहे.

इस्लापूर पोलिस ठाण्यांच्या अंतर्गत रिठा परिसरात रात्रीची गस्त घालत असतांना दोन ट्रॅक्टर वाळूने भरुन अवैध रित्या वाहतूक करीत असतांना पोलिसांना मिळून आले. दरम्यानं या दोन्ही ट्रॅक्टर ला ताब्यात घेऊन पोलिसांनी ही कारवाई केली. फिर्यादी ओमप्रकाश लक्ष्मण डिडेवार यांच्या फिर्यादीवरून आरोपी अमर मारोती केंद्रे रा. भंडारवाडी व गिरप्पा श्रीरंग नागरगोजे रा.पिंपरी यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातील वाळूने भरलेले ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. २६ बी क्यू १०३३ किंमत ४ लाख ५० हजार, व तसेच दुसरे ट्रॅक्टर डी.टी. ५० किंमत ३ लाख ७० हजार असा एकून ८ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अबीनाशकुमार, अतिरिक्त पोलिस अधीक्षक खंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी रामचंद्र मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली केल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांनी सांगितले. दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस रात्रंदिवस एक करून सेवा देतात.परंतू माहेवारी हजारो रुपयांचा गल्लेलठ्ठ पगार घेवून महसूल व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व कर्मचारी काम बरोबर करीत नसल्याचे या भागातील नागरिकांचे म्हणणे आहे.या दोन्ही विभागांच्या कामगीरीकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष वेधून,दोषीं व कामचूकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी आता सुजान नागरीकांतून जोर धरु लागली आहे.

# आदमपुरात चिमणी दिनानिमित्त मडकेरूपी तरंगता निवारा

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २४ मार्च**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे रविवार दि.२३ मार्च रोजी जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधत गावातील पक्षी प्रेमी हौशी तरुणांकडून सिमेंटच्या जंगलात दुर्मिळ होत. चाललेल्या चिमण्यांना पर्यावरणपूरक मडकेरूपी निवारा आणि दानापाण्याची व्यवस्था दत्त,महादेव,विठ्ठल रूक्मिणी,हनुमान मंदिर व मुख्य रस्त्यांलगत जमेल तसे डुलते मातीचे मडके टांगून करण्यात आली.त्या मडक्यांवर निसर्ग,पक्षी संवर्धन संदर्भात सुविचार ही लिहिण्यात आले होते. जागतिक चिमणी दिनानिमित्त सलग तीन वर्षांपासून हा उपक्रम सुरू आहे.

# राविकाँच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड, दि. २४ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या मागणीला अखेर यश मिळाले असून परीक्षा आवेदन पत्र भरण्याच्या अंतिम तारखेत वाढ करण्यात आली आहे. फैसल सिद्दिकी यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे निवेदन पाठवले होते. त्यामध्ये एम.ए. प्रथम व द्वितीय वर्षचा निकाल जाहीर होण्यास झालेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, अशी मागणी करण्यात आली होती.

## संक्षिप्त वृत्त



### महादगीर महाराज पुण्यतिथी निमित्य शिव महापुराण कथेचे आयोजन

**निवघा बा-**हदगाव तालुक्यातील मौजे उंचेगाव (बु.) येथे दि. २२ मार्च रोजी गावचे ग्रामदेवत श्री महादगीर महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्य शिव पुराण महाकथा व संत तुकाराम महाराज गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात सकाळी ७ ते १० या वेळेत श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायणाचे वाचन तपस्वी हभप माधवराव महाराज देशमुख उंचेगावकर यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून होणार आहे तर दुपारी १ ते ५ यावेळेत शिव महापुराण कथेचे वाचन हभप गीताताई पाटील महाराज छत्रपती संभाजीनगरकर यांच्या सुमधुरवांनीतून होणार आहे. या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ७ ते १० संत तुकाराम महाराज गाथा पारायण, दुपारी १ ते ५ शिवपुराण माहाकथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरी किर्तन होणार आहे. या सप्ताहात दररोज रात्री महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहेत तर दि. २९ मार्च रोजी सकाळी सात ते दहा या वेळेत नगर प्रदक्षिणा होऊन हभप पांडुरंग महाराज संमगेकर यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद होईल या धार्मिक कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी उंचेगाव (बु.) यांनी केले आहे.

### साईबाबा मंदिर कलशारोहण सातवा वर्धापन दिन २६ रोजी साजरा होणार

**नांदेड-**प्रती शिर्डी देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेड शहरालगत असलेल्या धनगरवाडी येथील श्री साईबाबा मंदिराच्या



कलशारोहण सोहळ्याचा सातवा वर्धापन दिन येत्या २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला असून यानिमित्त भव्य कीर्तन सोहळा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे . या सोहळ्याला भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले आहे. नांदेड जिल्ह्यातील ज्या भावी भक्तांना शिर्डी येथे जाऊन साईबाबांचे दर्शन घेणे कठीण असते किंबहुना ज्यांना साईबाबांचे दर्शन नित्यनेमाने करायचे हे अशा सर्व भावीकभक्तांसाठी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संकल्पनेतून धनगर वाडी येथे शिर्डी येथील साईबाबांचे प्रतिरूप स्थापन करण्यात आले आहे. या मंदिराची स्थापना होऊन आता सहा वर्षाचा कालावधी लोटला असून सातवा वर्धापन दिन दिनांक २६ मार्च रोजी पार पडणार आहे . यानिमित्त २६ रोजी दुपारी बारा वाजता हरिभक्त परायण पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांच्या कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे . या कीर्तन सोहळ्यास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर , जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य प्रणिताताई देवरे - चिखलीकर , हभप बालाजीराव पाटील मारतळेकर , ह भ प बालाजीराव झुंबाड , ह भ प बाबुराव केंद्रे , अमित पगडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित कलशारोहण वर्धापन दिनास , आणि महाप्रसादास भाविक भक्तांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन झंजावात ॲड. मामा येवले व्याख्यानमालेचे उद्या पहिले पुष्प

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च**

नांदेड आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन झंजावत ॲड. मामा येवले यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त दिनांक २६ मार्च रोजी नांदेड येथे व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प विख्यात आंबेडकरवादी विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे हे गुंफणार आहेत अशी माहिती संयोजन समितीचे मार्गदर्शक सुरेशदादा गायकवाड, प्रफुल सावंत यांनी पत्रकार परिषदेतून दिली. यावेळी रमेश गोडबोले, सुरेश हटकर, प्रकाश येवले, सुखदेव चिखलीकर आदींची उपस्थिती होती.

कुसुम सभागृहात सायंकाळी ५ वाजता पार पडणाऱ्या या व्याख्यानमालेचे माजी लेडी गव्हर्नर तथा विश्वस्त, प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी नागपूरच्या प्रा. डॉ. कमलताई गवई यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे प्रजासत्ताक भारताच्या जडणघडणीतील योगदान' या विषयावर आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार डॉ.ऋषिकेश कांबळे हे विचार पुष्प गुंफणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा.चंद्रकांत हांडोरे, खा.प्रा. रविंद्र चव्हाण, दिपक कदम यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ कवी प्रा. रविचंद्र हाडसनकर हे भूषविणार आहेत. याच वेळी जागतिक बौद्ध परिषद, बैंकॉक, थायलंडचे भारतातील प्रादेशिक केंद्र क्रं. ७५, प्रज्ञाकरुणा विहार समिती, नांदेडच्या वतीने मातोश्री रमाई आंबेडकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार २०२५ प्रा. डॉ. कमलताई गवई साहिवा यांना हा पहिला पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. या व्याख्यानमालेत बुद्ध-भीम गीत रजनी सुप्रसिद्ध गायक संविधान मनोहरे, अमरावती, गायक क्रांतीकुमार पंडित आणि संच नांदेड यांच्या बुद्ध-भीम गीतांचा सुमधुर सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या वार्षिक तपासणीत पोलीस पाटलांनी केला अवैध दारू विक्रीचा भांडाफोड

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. २४ मार्च**

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नुकतेच तामसा पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी केली. वार्षिक तपासणीत पोलीस ठाण्याच्या कारभाराबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले असले तरी पोलीस पाटील यांच्या बैठकीत पोलीस पाटील यांनीच अवैध दारू विक्रीचा भांडाफोड केल्याने तामसा पोलिसांची ऐनवेळी भंबेरी उडाली होती.

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराया धरणे व अर्धापूर इन्चार्ज भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी शुक्रवारी पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणीच्या निमित्ताने तामसा पोलीस ठाण्यात भेट दिली होती. नांदेड परिक्षेत्राचे कर्तव्यदक्ष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस ठाण्याची विस्तृत तपासणी केल्यानंतर तामसा पोलीस ठाणेअंतर्गत गावातील पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामसुरक्षा दल यांची संयुक्तिक बैठक घेऊन त्यांना गावात शांतता राखण्यासाठी सविस्तर मुद्द्यावर मार्गदर्शन केले. पोलीस पाटील यांच्या अडचणी जाणून घेताना अनेक पोलीस पाटील यांनी गावागावात राजरोसपणे अवैध दारू विक्री चालू असून अवैध दारू विक्रीमुळे गावातील शांतता राखण्यात बाधा निर्माण होत असल्याचा मुद्दा मांडला. अवैध दारू विक्रीचा पोलीस पाटलांनीच भांडाफोड केल्याने उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या निश्चितच भुवया उंचावल्या होत्या. त्यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांनी तामसा पोलिसांना त्याबद्दल समज देत अवैध दारू विक्रीविरुद्ध तामसा पोलीस कारवाई करत नसतील तर पोलीस पाटलांनी थेट माझ्याशी संपर्क साधण्याचा सल्ला देत पोलीस उपमहानिरीक्षक यांनी त्यांचा मोबाईल नंबर पोलीस पाटलांना दिला. तामसा पोलीस ठाण्याला नव्याने रुजू झालेली सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांना अवैध दारू विक्रीसह अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या कडक निर्देश दिले. उल्लेखनीय म्हणजे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर हे केवळ पंधरा ते वीस दिवसांपूर्वी तामसा पोलीस ठाण्याला रुजू झाल्याने आणि रुजू होताच त्यांनी काही गावातील अवैध दारू विक्रीवर कारवाई केल्यामुळे त्यांच्यावर कदाचित संभाव्य कारवाई होऊ शकली नसावी असे समजते.

मागील काळात बीट जमादारांनी मनमानी कारभार करीत अनेक गावात अवैध दारू विक्रीला मूकसंमती दिल्याची यावेळी जोरदार चर्चा होती.

# शांती आणि एकात्मतेचा संदेश : वसीम बाबू यांच्या कार्यालयात दावत ए इफ्तार पार्टीचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च**

शांती आणि एकात्मतेचा संदेश देत येथे मुतावल्ली कुटुंब आणि मित्रांकडून वसीम बाबू सेठ यांच्या कार्यालयात दावत ए इफ्तार पार्टी आयोजित करण्यात आली होती, ज्यात धार्मिक सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

जेमचे महामन ई काउसी, पैयाबोधी भन्ते, फादर रेव्ह. राज जॉन्सन याकूब, गुरुद्वारा बोर्डाचे माजी अधीक्षक सरदार रणजितसिंघ चिरागीया, मराठा सेवा संघ राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, प्रशासनाकडून सहाय्यक नगरपालिका आयुक्त गिरीश कदम, पोलिस उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक, वजीराबादचे पोलिस निरीक्षक परमेश्वर कदम, वजिराबादचे पोलिस



निरीक्षक रणजित भिटे, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक साहेबराव गुट्टे, पत्रकार पंढरीनाथ बोकारे, वसीम बाबू सेठ, सत्य मराठीचे संपादक अयुब पठाण, नांदेड टुडेचे संपादक नईम खान यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येकाने प्रत्येक उत्सव एकत्र साजरा केला पाहिजे अशी भावना भन्ते पैयाबोधी यांनी यावेळी मार्गदर्शन करताना व्यक्त केली. इफ्तार पार्टीचे आयोजन केल्याने परस्पर बंधुता वाढते. भारत विविधतेत ऐक्याचे प्रतीक आहे. आपण कोणत्याही विभाजनशील सामर्थ्याच्या जाळ्यात अडकू नये. होळी, गुडी पडवा आणि ईद हे सर्व उत्सव आम्हाला एकत्र राहण्यास शिकवतात. आपण सर्वांनी हे एकत्र साजरे केले पाहिजे कारण ऐक्य ही आपली खरी शक्ती आहे असे प्रतिपादन वसीम बाबू सेठ यांनी केले. राज्य आणि देशाच्या समृद्धी, ऐक्य आणि शांततेसाठी यावेळी प्रार्थना करण्यात आली.

# नांदेड येथील महामोर्चात बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे : जितेंद्र ढवळे

**तभा वृतसेवा**
**कंधार , दि. २४ मार्च**

बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, या मुख्य मागणीसाठी नांदेड येथे मंगळवार, २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता भिख्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, विविध



आंबेडकरी पक्ष, संघटना व समस्त बौद्ध समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान, नांदेड येथून महामोर्चाला सुरुवात होणार आहे. हा मोर्चा महात्मा फुले पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. या महामोर्चात कंधार तालुक्यातील हजारो बौद्ध समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष जितेंद्र ढवळे यांनी केले आहे.

# विद्यापीठ वार्षिक स्नेहसंमेलनाचे आज उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसराचे 'ज्ञानतीर्थ-२०२५' वार्षिक स्नेहसंमेलन दि. २५ ते २६ मार्च या कालावधीत संपन्न होणार आहे. दि. २५ मार्च रोजी स. १०:३० वा. विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवी आणि कादंबरीकार डॉ. मनोज बोरगावकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या स्नेहसंमेलनाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ दि. २६ मार्च रोजी सायंकाळी ०५:३० वा. दीक्षान्त सभागृहामध्ये होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर असणार आहेत. यावेळी प्र -कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून 'भोंगा' या राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त चित्रपटाचे अभिनेते श्री कपिल गुडसूरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या प्रसंगी कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांची उपस्थिती राहणार आहे. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धे चे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. १० ते १२ मार्च या कालावधीमध्ये क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांच्या संयोजनाखाली विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांच्या क्रिकेट स्पर्धा (मुले/मुली), व्हॉलीबॉल स्पर्धा (मुले/मुली) आणि १०० मीटर धावणे इत्यादी विविध क्रीडा स्पर्धा संपन्न झालेल्या आहेत.




**लोहा-नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उप विभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप हे कंधार येथे विभागांतर्गत वार्षिक तपासणीसाठी आलें आसता संगमवाडीचे सरपंच चक्रधर घुगे, माजी सरपंच दगडोबा घुगे, संभाजी घुगे ,परमेश्वर घुगे ,तंटामुक्ती अध्यक्ष गोपीनाथ घुगे ,सदस्य भानुदास घुगे, शिवाजी घुगे, ज्येष्ठ मार्गदर्शक भानुदासराव घुगे, रामदास घुगे ,व गावकऱ्याच्या वतीने त्यांचा सत्कार केला.**

# बँड वाजवत नगरपालिकेची कर वसुली

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २४ मार्च**

हदगाव नगरपालिकेची घर टॅक्स व पाणीपट्टीची वसुली तसेच गाळे भाडे थकबाकी जास्त असल्याने कर दात्यांच्या घरासमोर बँड वाजवुन कर भरण्यासाठी सांगण्यात येऊन वसुली करण्यात येत आहे.

हदगाव शहरातील नागरिकांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी नगरपालिका कटीबद्ध असुन विविध योजना राबविण्यासाठी नगर पलीकेला आपल्या स्वतःचा वाटा भरावा लागत असतो त्यासाठी नगरपालिकडे पैसा उपलब्ध राहत नसल्याने काही सुविधा या मिळू शकत नाही. त्यामुळे नागरिकाकडील कराची वसुली करणे गरजेचे आहे त्यासाठी उपाययोजना करून वसुली करावी लागत आहे.शहरातील नागरिकाकडे ३० लाखाची कराची वसुली थकीत असून नागरिकांनी स्वतःहून किंवा वसुलीस आलेल्या कर्मचाऱ्यांना



आपल्या कडील कराची थकबाकी भरून नगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले आहे.

या वसुली पथकात प्रवीण मंगनाळे ,प्रशांत डोईजड ,गोविंद शिरसाठ, रवी ढेंगळे ,संकेत लांडगे , गोविंद नागरगोजे, नामदेव राठोड, सुरेश गिरबिडे ,सिद्धार्थ पंडित ,दिगंबर काळे, शेख मुसा ,शेख शार्दुल, महेमूद, शंकर काळे, महेश पुसेल्लु आदी या पथकात कार्यरत असून त्यांच्याकडे सर्वांनी कर भरणा करण्यात यावा अन्यथा पाणीपुरवठा बंद करण्यात येईल तसेच घराचा कर थकीत असल्यास घरावर देखील कारवाई करण्यात येईल असे वसुली पथक प्रमुख प्रवीण मगनाळे यांनी सांगितले.

# नव्या भुयारी पुलाकडे जणारा रस्ता खड्डेमय झाल्यामुळे वाहनधारक त्रस्त

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ मार्च**

मुदखेड शहरातील सुभाष गंज मोंढा भागातील जिवाजी महाले चौकापासून पासून पश्चिमेस भुयारी पुल मार्गास जोडणारा १५० मीटर रस्ता, मुख्य रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. परिणामी, रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. खड्डे पडल्याने खड्ड्यांमधील माती,गिट्टी,खडी रस्त्यावर आल्याने सर्वत्र परिसरात धूळ पसरल्याने या ठिकाणाहून ये-जा करताना वाहनधारकांना अपघाताचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे, अनेक वर्षांपासून हीच परिस्थिती असूनही नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधी रस्ते कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांनी संताप



व्यक्त केला आहे.

अनेक वर्षांपासून रेल्वे गेट वर होणारी वारंवार वाहुतुकीची कोंडी रेल्वे भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहतूक सुरळीत चालू झाली, परंतु शहर व शहराबाहेरील अनेक रस्त्यांना जोडला जाणारा हा मुख्य रस्ता जिवाजी महाले चौकापासून पश्चिमेस अंदाजे १५० मिटर अंतर असुन मोंढा येथील मुख्य बाजार पेठ,गणेश मंदिर, नवि आबादी, भोकर रस्ता, कृषी कार्यालय आदी विविध कार्यालये असून रेल्वे भुयारी मार्ग सुरू झाल्याने हा रस्ता मुख्य रस्ता झाला आहे. नागरिक या रस्त्याचा दिवसभरात वापर करीत असतात.गेल्या ५० वर्षांपासून या रस्त्याच्या नालीचे रुंदीकरणाचे काम झाले नसल्याने सांडपाणी करण्यास अडथळा येत आहे, या रस्त्यावर जागोजागी खड्डेच खड्डे पडलेले आहेत. अनेक वेळा दुचाकी वाहनांचे छोटे-मोठे अपघात होत आहेत. यासह रस्त्याचे नव्याने काम न झाल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. पुन्हा एकदा रस्त्या-नालीचे काम करून नागरिकांना पूर्ववत रस्ता करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. याप्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद मुदखेड यांना भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष संजय उर्फ पप्पू सोनटक्के यांनी निवेदन दिले आहे.

# बीड जिल्हा परिषदेचा १५ कोटी २१ लाखाचा शिलकीचा अर्थसंकल्प

## सीईओ आदित्य जीवने यांनी केला अर्थसंकल्प जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मार्च**

बीड जिल्हा परिषदेच्या २०२५-२६ या वर्षातील आरंभीची असेल ते सह एकूण महसुली जमा रुपये १६, १३,३१, १०२ इतकी असून प्रस्तावित खर्च १५ कोटी २१ लक्ष असून ९१ लक्ष ४३ हजार १०२ इतका महसुली समितीच्या अर्थसंकल्पास आदित्य जीवने बीड जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोमवारी सदर माहिती सभागृहात दिली. यावेळी प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी जिल्हा परिषदेच्या विभागनिहाय खर्चाच्या यावेळी बाबनिहाय तरतुद सादर केली. बांधकाम विभाग दोन कोटी ४४ लक्ष १४ हजार, शिक्षण विभाग १ कोटी ७४ लक्ष ४५०००, आरोग्य विभाग १९ लक्ष २०००, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ०१ कोटी, समाज कल्याण विभाग ०३ कोटी ५१ लक्ष १००००, महिला व बालकल्याण विभाग ७४ लक्ष ४०००, कृषी विभाग ३० लक्ष ४० हजार, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग ७४ लक्ष ३०००, वनीकरण विभाग व व्याज १०,०००, पंचायत राज कार्यक्रम विभाग ०३ कोटी ९३ लक्ष ५६ हजार, लघु पाटबंधारे विभाग १०, ४००, एकूण १५



कोटी २१ लक्ष ८८,००० रुपयाच्या प्रस्ताविक खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

यावेळी अर्थसंकल्प मांडताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी, ग्रामविकासासाठी बीड जिल्हा परिषद कटिबद्ध असून विविध महत्वकांक्षी निर्णय घेण्यात आले आहेत ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण महिलांचे सबलीकरण, शिक्षण आणि आरोग्य विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तरतुदीसह माहिती तसादर केली. जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागाच्या उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण विकासाच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठीच्या योजना राबविण्याचा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी महसुली जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे सविस्तर वाचन करून उपस्थित विभाग प्रमुख आणि पत्रकारांना सविस्तर माहिती दिली.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, प्रकल्प संचालक राजेश मोराळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम (१), पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख, आदीसह विभाग प्रमुख उपस्थित होते.

# सैन्यदलात निवडीबद्दल गावकऱ्यांनी केला हृदय सत्कार

## मोहा गावचे दोन भूमिपुत्र देशसेवेत दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ मार्च**

परळी तालुक्यातील मोहा गावाचे सुपुत्र बंडू कांबळे आणि अभिषेक कांबळे यांची भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या यशस्वी निवडीबद्दल मोहा गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत व सत्कार करण्यात आला.

गावातील महाराष्ट्र विद्यालय येथील विद्यार्थी असलेले गावातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या बंडू कांबळे व अभिषेक कांबळे यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर भारतीय लष्करात स्थान मिळवले. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावाचा अभिमान वाढला असून, ग्रामस्थांनी त्यांच्या सत्कार समारंभ आयोजित करून कौतुकाची थाप देत त्यांचा हा प्रवास गावातील इतर युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत अनेकांनी व्यक्त केले. या सत्कार सोहळ्या कार्यक्रमासाठी मोहा व वंजारवाडी परिसरातील सुदाम शिंदे, दत्ता कांबळे, वैजनाथ पाळवदे, प्रवीण देशमुख, विष्णू देशमुख, विश्वंभर वाघमारे, रमेश बुरांडे, विशाल देशमुख, इस्माईल शेख, कमलदास चाटे, केरबा दादा पाळवदे, संदीपान शेरकर, देविदास देशमुख, भानुदास लोंढे, प्रविण शिंदे, बळी शेप यांच्यासह असंख्य गावकरी उपस्थित होते.

## स्वा सावरकर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. लक्ष्मीकांतबाहेगव्हाणकर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मार्च**

येथील स्वा सावरकर कर्मचारी सहकारी पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक २०२५ - ३० बिनविरोध संपन्न झाली. नवनिर्वाचित संचालकांनी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध केली.अध्यक्षपदी डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपाध्यक्षपदी सचिन सानप, तर सचिव पदी प्रा. शशिकांत पसारकर यांची निवड करण्यात आली.

सावरकर पतसंस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी सुनील जाधव यांच्या उपस्थितीत दि २३/३/२५ रोजी संपन्न झाली . सर्व संचालकांनी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव पदाची निवडणूक बिनविरोध करण्याचे जाहीर केले. अध्यक्षपदी सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपाध्यक्षपदी प्राथमिक विद्यालयाचे सचिन सानप, सचिवपदी सावरकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा शशिकांत पसारकर, यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये कोषाध्यक्षपदी उमेश जगताप, सहसचिवपदी प्रा.डॉ. रूपाली कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या बैठकीला नवनिर्वाचित संचालक प्रा डॉ. रमेश खंडागळे, प्रा संजय काळे, शरद ढवळे, सत्यवान गिरी, विनायक कुलकर्णी, यांची उपस्थिती होती. बैठकीनंतर पतसंस्थेचे मार्गदर्शक संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्राध्यापक चंद्रकांत मुळे यांनी सर्व पदाधिकारी व नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यापुढेही *सभासदांना केंद्र बिंदू मानून त्यांच्या हितासाठी पतसंस्था कार्य करेल अशी प्रतिक्रिया सर्व नव निर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# पंतप्रधान रोजगार निर्मिती जनजागृती मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मार्च**



दिनांक २१ मार्च रोजी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ व जन शिक्षण संस्थान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जन शिक्षण संस्थांनच्या प्रशिक्षार्थी व पीएम विश्वकर्माचे लाभार्थी यांच्याकरिता उद्योजकता विकास , भारत सरकार व महाराष्ट्र सरकारच्या विविध वित्तीय योजनांच्या संदर्भात माहिती देण्यासाठी जनजागृती मेळाव्याचे आयोजन दीनदयाल शोध संस्थान येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजीनगर येथील उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर या होत्या.

पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना मुद्रा लोन इत्यादी बाबतीत आवश्यक असणारी कागदपत्रे सबसिडी व इतर तांत्रिक माहिती जिल्हा ग्राम उद्योग अधिकारी श्री डी व्ही फताटे यांनी दिली.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव यांनी उपस्थितांना उद्योजकता याविषयी मार्गदर्शन केले तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक शिवशंकर लायलवार यांनी बँकेद्वारे दिले जाणाऱ्या कर्जाची माहिती दिली. जन शिक्षण संस्थांचे संचालक गंगाधर देशमुख यांनी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकारच्या विविध कौशल्य विकास प्रशिक्षणाची माहिती दिली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना अंजली धानोरकर यांनी विविध उदाहरणे देऊन महिला व पुरुषांनी स्वतःचे उद्योग व्यवसाय कसे वाढवावेत व त्यासाठी कोणत्या प्रकारे मेहनत घ्यावी याविषयीची माहिती देत मार्गदर्शन केले

या कार्यक्रमाचे औचित्य साधून पीएम विश्वकर्मा योजनेतील प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थींना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी सीमा मनुरकर यांनी केले तर आभार सुदाम पालकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून २१५ पेक्षा जास्त लाभार्थी उपस्थित होते

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खादी ग्रामोद्योग मंडळातील अधिकारी कर्मचारी जन शिक्षण संस्थांनचे सीमा मनुरकर, सुदाम पालकर, धर्मराज जाडकर, स्वाती जैन, स्नेहल केवडकर, सुमेधा मनसबदार, नितीन क्षीरसागर, विशाल वाघमारे, प्रभाकर सोळंके आदींनी परिश्रम घेतले.याप्रसंगी नाभिक महामंडळाकडून जन शिक्षण संस्थांनच्या सेविका सुनीता वाघमारे यांचा आदर्श माता म्हणून सन्मान करण्यात आला.

# कर्तृत्ववान महिलांचा किल्ले धारूर युथ क्लबकडून गौरव!

## जागतिक महिला दिनानिमित्त धारूरमध्ये विशेष कार्यक्रम; विविध क्षेत्रांतील महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२४ मार्च**

धारूर येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या युथ क्लब संघटनेने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान केला. शनिवारी, २२ मार्च रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय नाट्यगृहात हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरच्या उपजिल्हाधिकारी अंजली हजारी, अध्यक्ष प्रा. दीप्ती मिश्रा आणि युथ क्लबचे संस्थापक अध्यक्ष संतोष दुबे, व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे अध्यक्ष अतुल शिनगारे, युथ क्लब अध्यक्ष दत्ता गोरे यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये उपजिल्हाधिकारी अंजली हजारी, नेमबाज जागृती तिवारी, गायिका गीता नागरगोजे, शिवणकाम व्यवसायातून मुलांना उच्चशिक्षित करणाऱ्या रेखा कंकाळ, प्राचार्य ज्योतीदेवी हजारी, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. संध्या गुन्नाल आणि कवयित्री साक्षी मुंडे यांचा समावेश होता.

उपजिल्हाधिकारी अंजली हजारी आणि प्रा. दीप्ती मिश्रा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर रेखा कंकाळ आणि डॉ. संध्या गुन्नाल यांनी युथ क्लबचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. विजय शिनगारे यांनी जागतिक जल दिनानिमित्त पाणी बचतीचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ता सूर्यकांत जगताप यांनी केले आणि आभार विश्वनंद तोष्णीवाल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युथ क्लबचे अध्यक्ष दत्तात्रय गोरे, सचिव विश्वनंद तोष्णीवाल, उपाध्यक्ष बाबा देवडे आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महिला आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# दंगल सदृश्य परस्थिती हताळन्या साठी अंबाजोगाई शहर, ग्रामीण व बर्दापूर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यासाठी घेण्यात आली जमाव विसर्जन रंगीत तालीम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ मार्च**

दंगल सदृश्य परस्थिती निर्माण झाल्या नंतर पोलिसांना ही वेळीच हताळता यावी या साठी अंबाजोगाई शहर, ग्रामीण व बर्दापूर पोलीस स्टेशन च्या सर्व कर्मचाऱ्या साठी जमाव विसर्जन रंगीत तालीम घेण्यात आली.



येथील यशवंत राव चव्हाण चौका नजिक असलेल्या क्रीडा संकुलाच्या मैदानात पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शना खाली उप विभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या प्रमुख उपस्थिती मधे संपन्न झालेल्या या जमाव विसर्जन रंगीत तालीम प्रसंगी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनंचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राम पडवळ, बर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार ससाने यांच्या आधीपत्या खाली शहर पोलीस स्टेशन, ग्रामीण पोलीस स्टेशन व बर्दापूर पोलीस स्टेशनचे सर्व महिला पुरुष कर्मचारी उपस्थित होते.

या सर्व कर्मचाऱ्यांना जमाव विसर्जन रंगीत तालीम देण्या साठी बीड पोलिस मुख्यालयातून प्रशिक्षक म्हणून पो हे कॉ संजय रामराव भुतके यांची विशेष उपस्थिती होती.या वेळी मैदानावर आंदोलन कर्ता जमाव तयार करण्यात आला होता. हा जमाव शासनाच्या व पोलिसांच्या विरोधात घोषणा देत होता, जमावाला शांत करण्या साठी ध्वनी क्षेपका द्वारे सह्यायक पोलीस निरीक्षक निलंगेकर हे सूचना देत होते. याच वेळी पोलीस कर्मचाऱ्यांना जमावाला हताळण्या संदर्भात सूचना देण्यात येत होत्या. संतप्त जमाव दगदफेक करत होता. याच वेळी जमाव पांगवण्या साठी सर्व प्रथम लाठीचार्ज, त्या नंतर ढाल सेक्शनचा प्रयोग, त्या नंतर गॅस सेक्शनचा प्रयोग, रायफल सेक्शनचा प्रयोग करण्यात आला. या वेळी जमावाला भडकवणाऱ्या मुख्यसूत्रधारास शोधून त्याला ताब्यात कसे घ्यायचे या संदर्भात सूचना देण्यात आल्या. तसेच गोळीबार करून जमाव पांगवताना

जखमी होऊन पडलेल्या इसमास ताब्यात घेईन त्याला उपचारार्थ रुग्णालयात कसे पाठवायचे याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.एकूणच या रंगीत तालीमच्या वेळी पोलीस कर्मचारी व आंदोलनकर्ते यांच्यात उत्साह पहावयास मिळाला.

# शहीद दिनानिमित्त महान क्रांतिकारक भगत सिंह, सुखदेव व शिवराम हरी राजगुरू यांना विनम्र अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मार्च**

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भूगोल विभाग च्या अंतर्गत प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या उपस्थितीत शहीद दिनानिमित्त महान क्रांतिकारक भगत सिंह,सुखदेव व शिवराम हरी राजगुरू यांना विनम्र अभिवादन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उप प्राचार्य डॉ उत्तम साळवे, भूगोल विभाग प्रमुख डॉ अशोक डोके, डॉ अरविंद रायलवार, स्टाफ सेक्रेटरी प्रा.राम गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे, डॉ. सुहास जोशी, डॉ संगीता ससाने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# सर्व पत्रकारांना सोबत घेवून काम करणार- गजानन मुडेगावकर

## मराठी पत्रकार परिषद डिजीटल मिडीयाच्या वतीने सत्कार समारंभात बोलताना विश्वास व्यक्त केला

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ मार्च**

अंबाजोगाई तालुका मराठी पत्रकार परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष गजानन मुडेगावकर यांची नुकतीच बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल अंबाजोगाई तालुका डीजीटल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आज बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्षात सत्कार करण्यात आला.



या सत्कार समारंभात बोलताना गजानन मुडेगावकर यांनी म्हटले की,माझी निवड मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशावरून तसेच डिजीटल मिडीयाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली.माझ्यावर देण्यात आलेली जबाबदारी मी उत्तमरित्या पार पाडणार आहे.अंबाजोगाई तालुका डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्यांना सोबत घेवून काम करणार आहे.मराठी पत्रकार परिषद संबंधित सर्व पत्रकार सदस्यांना विश्वासात घेवून कार्य करताना समान वागणूक देण्यात येईल. फेरनिवड झालेले बीड जिल्हाध्यक्ष सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करून पत्रकारांच्या अडी अडचणी सोडवण्यास तत्पर राहील.अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.प्रास्ताविक भाषणात डिजीटल मिडीयाचे मार्गदर्शक सतीश मोरे यांनी गजानन मुडेगावकर यांची बीड कार्याध्यक्ष झाल्याबद्दल शुभेच्छा देत म्हटले की,येथून पुढे प्रिंट मिडिया व डीजीटल मिडीया भांवडांप्रमाणे कार्य करीत राहतील.तर डिजीटल मिडीयाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी सुध्दा आपले विचार मांडतांना म्हटले की, मराठी पत्रकार परिषदेच्या विश्वस्तांनी गजानन मुडेगावकर यांच्या खांद्यावर संपूर्ण जिल्ह्याची धुरा दिली ती उत्तमरित्या सांभाळतील यात कसलीही शंका नाही.निश्चितच सर्व पत्रकारांना सोबत घेवून काम करतील असा विश्वासही व्यक्त केला.

यावेळी राहुल देशपांडे,बालाजी खैरमोडे,मारोती जोगदंड, शेखमुशीर बाबा,व्यंकटेश जोशी,संजय जोगदंड, योगेश डाके,कांबळे,दादा सय्यद नईम, अहमद पठाण बालाजी देशमुख,आरेफ सिद्दिकी,सह प्रिंट व डीजीटल मिडीयाचे सर्व सदस्य उपस्थित होते.